अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १८३ । गुरूवार १६ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'

भाग २९

## आत्मसाक्षात्कारानेच ईश्वराची खरी ओळख

परमेश्वराविषयीचे आपले ज्ञान आजवर अर्धवटच आहे. ज्या देवाने आपल्याला हे शरीर, डोळे आणि बुद्धी दिली, त्याला पाहण्यासाठी साध्या डोळ्यांची नाही, तर 'आत्मदर्शनाची' गरज असते. आपण कोण आहोत आणि आपल्याला घडवणारा तो परमेश्वर कसा आहे, हे केवळ आत्म साक्षात्काराद्वारेच समजते.

१९ जानेवारी १९७९ रोजी मुंबईत झालेल्या प्रवचनात स्पष्ट केल्यानुसार, जोपर्यंत आपल्याला आत्म्याचे दर्शन होत नाही, तोपर्यंत आपण त्या सर्वव्यापी शक्तीशी संवाद साधू शकत नाही. 'परमेश्वराशिवाय पानही हलत नाही' हे सत्य अनुभवण्यासाठी स्वतःच्या अंतरंगातील चैतन्याला जागृत करणे आवश्यक आहे. आज सहजयोगाच्या माध्यमातून हजारो साधकांनी हा आत्मसाक्षात्कार प्राप्त केला आहे. जेव्हा माणूस 'पार' होतो, तेव्हा त्याचा आत्मा जागृत होऊन बोलू लागतो. म्हणूनच, बाह्य कर्मकांडांऐवजी प्रथम स्वतःच्या आत्म्याला ओळखा. आत्मसाक्षात्कार हीच ती व्यवस्था आहे, ज्याद्वारे आपण त्या सर्वव्यापी ईश्वरी शक्तीशी खऱ्या अर्थाने जोडले जाऊ शकतो.

अधिक माहितीसाठी: sahajayogamumbai.org(https://www.sahajayogamumbai.org)

# भोंदू खरातचे पॉलिटिकल कनेक्शन रडारवर

## जलसंपदा मंत्री विखे पाटील : सर्वांची चौकशी होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नाशिक :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात दररोज नवनवे खळबळजनक खुलासे होत असतानाच, आता राज्य सरकारने या प्रकरणातील राजकीय कनेक्शनची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल आणि यात दोषी आढळणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, मग ती कितीही मोठी असली तरी सोडले जाणार नाही, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नाशिक येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत अशोक खरातच्या कॉल लिस्टचा हवाला देत काही राजकीय नेत्यांवर आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले होते. या पार्श्वभूमीवर विखे पाटील यांना विचारले असता ते म्हणाले की, तपास यंत्रणा आपले काम करत आहेत. कॉल रेकॉर्ड्स आणि इतर पुराव्यांच्या आधारे पोलीस तपास सुरू आहे. जर कोणी या प्रकरणातील आरोपीला अभय देत असेल किंवा यात सहभागी असेल, तर ते तपासात निष्पन्न होईलच.

अशोक खरातच्या समता पतसंस्थेतील आर्थिक व्यवहार आणि त्याच्या राजकीय संपर्काबाबत विचारले असता, मंत्र्यांनी स्पष्ट केले की शासन अशा प्रकरणांमध्ये अत्यंत संवेदनशील आहे. सामान्य जनतेची फसवणूक आणि महिलांचे शोषण करणाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या प्रकरणातील फरार आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके तैनात केली असून, लवकरच या प्रकरणाचा छडा लागेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.



अशोक खरात प्रकरणात आम्ही पहिला गुन्हा दाखल केला म्हणून हे प्रकरण उघडकीस आले. अनेक महिला अशोक खरातच्या वलयाला बळी पडल्या. अंजली दमानिया यांनी जे आरोप केले आहेत, त्याबाबतचे सत्य चौकशीत समोर येईल. अनेकांचे पाय धुताना फोटो आहेत, भाषण करताना नावं आलेली आहेत. आपल्या भागातील माणूस देवाचा अवतार आहे, असे समजून शिर्डीतील काही लोक बळी पडले. पण यासाठी लोकांना दोष देऊ नये, असे राधाकृष्ण विखे-पाटील यांनी म्हटले.

**मंत्री केसरकरांनी आग्रह केला म्हणून खरातकडे गेलो...**

एकनाथ शिंदे हे शिर्डीला आले होते तेव्हा मी त्यांच्यासोबत अशोक खरात याच्याकडे गेलो होतो. त्यावेळी दीपक केसरकर यांनी आग्रह केला, त्यामुळे मी त्यांच्यासोबत गेलो. काही गोष्टी अज्ञानातून घडल्या, असे वक्तव्य राज्याचे (पान ४ वर)

## अंजली दमानिया यांच्या आरोपांची सरकारकडून दखल



■ **कॉल लिस्टचा गौप्यस्फोट:** भोंदूबाबा अशोक खरातच्या मोबाईल फोनचा 'कॉल डेटा रेकॉर्ड' जाहीर करत, त्याचे नाशिकमधील अनेक बड्या राजकीय नेत्यांशी आणि त्यांच्या पीएंशी थेट कनेक्शन असल्याचा दावा.

■ **रुपाली चाकणकरांवर निशाणा:** माजी महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि अशोक खरात यांच्यात तब्बल १७७ वेळा फोनवर संभाषण झाले असून, एकाच दिवशी ३२ मिनिटे चर्चा झाल्याचा तपशील मांडला. चाकणकर यांची 'एसआयटी'कडून चौकशी करण्याची मागणी.

■ **तपास यंत्रणांवर ताशेरे:** खरातची पत्नी कल्पना खरात महिनाभरापासून फरार कशी? पोलिसांच्या पाळतीतून ती निसटली की तिला कोणाचे अभय आहे? असा सवाल उपस्थित करून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह.

■ **अजित पवारांच्या अपघाताचा संदर्भ:** अजित पवार यांच्या विमान अपघाताचा आणि खरातच्या समता पतसंस्थेतील आर्थिक व्यवहारांचा काही संबंध आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी.

■ **राजकीय नेत्यांना इशारा:** खरातचे कोणाकोणाशी संबंध होते, याची संपूर्ण 'जंत्री' आपल्याकडे असून वेळ आल्यास अधिक पुरावे उघड करण्याचा इशारा.

**ईडी चौकशीची मागणी:** या संपूर्ण प्रकरणात केवळ लैंगिक शोषण नसून मोठ्या प्रमाणावर 'मनी लाँड्रिंग' झाल्याचा संशय असल्याने अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) लक्ष घालण्याची गरज व्यक्त केली.

# सम्राट चौधरी बिहारचे नवे मुख्यमंत्री

## शपथविधी संपन्न : जेडीयूचे विजय चौधरी, बिजेंद्र यादव उपमुख्यमंत्री

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाटणा :** बिहारमध्ये आज पहिल्यांदाच भाजपच्या मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली. सकाळी ११ वाजता पाटणा येथील लोकभवनात सम्राट चौधरी यांनी बिहारचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांच्यासोबत जनता दल युनायटेड चे आमदार विजय चौधरी आणि बिजेंद्र यादव यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या आमदार दलाचा नेता म्हणून निवड झाल्यानंतर सम्राट चौधरी यांनी राज्यपालांसमोर सरकार स्थापनेचा दावा सादर केला होता.

माजी मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी सम्राट चौधरी यांना मखान्याची माळ घालून आपली राजकीय परंपरा सोपवली. आज सकाळी लोकभवन येथे राज्यपाल सैयद अता हसनैन यांनी सम्राट चौधरी यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ दिली. त्यांच्यासोबत विजय चौधरी आणि बिजेंद्र यादव यांनीही शपथ घेतली. हे दोघे जेडीयू कोट्यातून उपमुख्यमंत्री झाले आहेत. शपथविधी समारंभात केंद्रीय मंत्री जेपी नड्डा, शिवराज सिंह चौहान, तसेच माजी मुख्यमंत्री नीतीश कुमार आणि एनडीएतील अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते.




**कुशवाहा समाजातील सम्राट चौधरी यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९६८ रोजी झाला. त्यांनी १९९० मध्ये सक्रिय राजकारणात प्रवेश केला आणि सुरुवात राष्ट्रीय जनता दलातून केली. त्यानंतर जेडीयू, हम आणि शेवटी भाजपमध्ये प्रवेश करत त्यांनी दीर्घ राजकीय प्रवास केला आणि आता बिहारचे मुख्यमंत्री झाले आहेत**

२०२० मध्ये नीतीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार स्थापन झाले तेव्हा भाजपने दोन उपमुख्यमंत्री दिले होते-रेणू देवी आणि तारकिशोर प्रसाद. त्यानंतर दोन वेळा एनडीए सरकारच्या शपथविधीत सम्राट चौधरी आणि विजय सिन्हा यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले. आता भाजप मोठ्या भावाच्या भूमिकेत असल्याने जेडीयूमधून दोन उपमुख्यमंत्री करण्यात आले आहेत.

पूर्वी चर्चा होती की नीतीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार उपमुख्यमंत्री (पान ४ वर)

**महत्त्वाचे..**

## अकोल्यात उष्माघाताचा पहिला बळी !

अकोला : शहरातील मालवाहू ऑटोमध्ये एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. अकोला शहरातील जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत एका मालवाहू ऑटोमध्ये अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मृतदेहाच्या अंगावर कुठल्याही मारहाणीचा तसेच जखमा नाहीत. कदाचित या व्यक्तीचा उष्माघातामुळे मृत्यू झाला असावा, असा अंदाज पोलिसांनी या ठिकाणी व्यक्त केलाय. मृतदेह पोस्टमार्टमसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. अहवालानंतरच मृत्यूचं मूळ कारण स्पष्ट होईल. मात्र पोलिसांनी या मृत्यूमागे उष्माघाताचा संशय व्यक्त केला आहे. कारण मागील चार पाच दिवसापासून अकोल्याचे तापमान ४४ अंश सेल्सिअस पर्यंत वाढले आहे. त्यामुळे अकोल्यात पहिला उष्माघाताचा बळी गेला असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

## छत्तीसगडमधील थर्मल प्लांटमध्ये भीषण स्फोट; १७ कामगारांचा कोळसा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सक्ती :** छत्तीसगडमधील सक्ती जिल्ह्यातील सिंघीतराई येथे असलेल्या वेदांता लिमिटेडच्या थर्मल पॉवर प्लांटमध्ये मंगळवारी भीषण दुर्घटना घडून १७ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला, तर १० हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत. बॉयलरमधील हायप्रेशर वाफेची स्टील ट्यूब फुटल्याने हा स्फोट झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी नियमित काम सुरू असताना बॉयलरमधून टरबाइनकडे वाफ नेणारी स्टील ट्यूब अचानक फुटली. त्यावेळी बॉयलरचे तापमान सुमारे ७०० डिग्री सेल्सिअस होते. अतिउष्ण वाफेचा जोरदार फटका बसल्याने अनेक कामगारांना पळण्याची संधीही मिळाली नाही. काही जण जागीच मृत्युमुखी पडले, तर अनेकजण गंभीररित्या होरपळले. जखमींवर रायपूर व रायगड येथील रुग्णालयांत उपचार सुरू असून काहींची प्रकृती चिंताजनक आहे. दुर्घटनेनंतर प्रशासन, आपत्कालीन यंत्रणा आणि कंपनीकडून बचावकार्य हाती घेण्यात आले.

मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी मृतांच्या नातेवाईकांना ५ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. वेदांता कंपनीने मृतांच्या कुटुंबीयांना ३५ लाख रुपये, कुटुंबातील एका सदस्याला नोकरी तसेच जखमींना १५ लाखांची मदत व उपचाराचा संपूर्ण खर्च उचलण्याची घोषणा केली आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतूनही आर्थिक सहाय्य जाहीर करण्यात आले आहे.

दरम्यान, काँग्रेसने या दुर्घटनेबाबत प्लांट प्रशासनावर हलगर्जीपणाचा आरोप करत निष्पक्ष चौकशी व दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त होत आहे.

# १८० तरुणींचे लैंगिक शोषण : आयान अहमदसह चौघांना बेड्या


## राज्यभर संतापाची लाट : पक्षाशी संबंध नसल्याचा एमआयएमचा खुलासा


प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरावती :** जिल्ह्यातील परतवाडा येथील लैंगिक शोषण प्रकरणी अनेक धक्कादायक गोष्टी आता समोर येऊ लागल्या आहेत. या प्रकरणी अयान अहमद तन्वीर या १९ वर्षीय तरूणाला पोलिसांनी अटक केल्यानंतर तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे उजेर खान इकबाल खान, तरबेज खान तस्लिम खान आणि मोहम्मद साद मोहम्मद सादिक या तिघांनाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या. दरम्यान आरोपी एमआयएमचा पदाधिकारी असल्याची चर्चा होती. मात्र एमआयएमने या प्रकरणात पक्षाचा कुठलाही संबंध नसल्याचा खुलासा पत्रक काढून केला आहे.

या प्रकरणात सुरुवातीला १८० तरुणींवर लैंगिक शोषण झाल्याचे समोर आले होते. तसेच या तरुणींचे ३५० हून अधिक आक्षेपार्ह व्हिडीओ असल्याचे दावे समोर आले होते. अयाज हा एमआयएम पक्षाचा पदाधिकारी असल्याचे उघड झाले. अचलपूर नगर परिषद निवडणुकीच्या वेळी त्याला पक्षाचे सोशल मीडिया प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले होते. मात्र, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद आदिल शेख यांनी स्पष्ट केले की, पूर्ण निवडणुकीच्या काळात त्याने पक्षासाठी कोणतेही काम केले नाही, त्यामुळे त्याला पक्षातून काढून टाकण्यात आले. त्यामुळे एमआयएम पक्षाचा आणि या आरोपीचा सध्या कोणताही संबंध नाही.

याप्रकरणी आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. मुख्य आरोपी अयान अहमद हा कोणताही (पान ४ वर)





### आरोपी अयानच्या घरावर 'बुलडोझर'

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर येथील आरोपी अयान अहमद याच्या घरावर आज 'बुलडोजर' कारवाई करण्यात आली. त्याच्या घराचा काही भाग अतिक्रमित असल्याने नगर परिषदेने घराचा जीना तोडून टाकला. या कारवाईदरम्यान प्रचंड पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. लोकांनीही गर्दी केली होती. जेसीबीच्या माध्यमातून घराच्या बाजुला लावण्यात आलेला लोखंडी जिना तोडण्यात आला. कारवाई दरम्यान भाजपचे आमदार प्रवीण तायडे स्वत: हजर होते. कारवाईदरम्यान मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता आणि नागरिकांची देखील मोठी गर्दी झाली होती. अशा प्रकारे बुलडोजरच्या सहाय्याने कारवाई करण्याची अचलपूरमधील पहिलीच घटना असल्याचे सांगण्यात येत आहे.

### १० अधिकारी ३६ अंमलदारांचे पथक

परतवाडा येथील लैंगिक शोषण प्रकरणी सहायक पोलीस अधीक्षक तथा अचलपूर येथील पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. शुभम कुमार यांच्या नेतृत्वात १० पोलीस अधिकारी आणि ३६ अंमलदाराचे स्वतंत्र विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. त्यात तपास अधिकारी पोलीस निरीक्षक सुरेश म्हस्के, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांचा समावेश आहे. हे गंभीर प्रकरण उघडकीस आल्यानंतर या प्रकरणाच्या संपूर्ण चौकशीसाठी एसआयटीची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्यासह अनेक नेत्यांनी केली होती.

## कुल्फीमध्ये भेसळ; अन्न व औषध विभागाची धाड, १८५६ पॅकेट्स जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** सध्या उन्हाचा पारा वाढल्याने आईस्क्रीम आणि शीतपेय घेण्यासाठी, नागरिकांची गर्दी होत आहे. बाजारात अनेक कंपन्यांच्या कुल्फी आणि आईसक्रीमही उपलब्ध आहेत. पण यामध्ये भेसळ असेल तर आरोग्यास त्या अपायकारक ठरू शकते. अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अन्न आणि औषध प्रशासन विभागाने टाकलेल्या छाप्यात एका ब्रँडेड कंपनीच्या कुल्फीत भेसळ असल्याचे उघडकीस आले. अहिल्यानगर अन्न आणि औषध प्रशासनाने भेसळयुक्त कुल्फीविरोधात कारवाई करत तब्बल १ हजार ८५६ पॅकेट्स कुल्फी जप्त केली आहे. त्यामुळे, ऐन उन्हाळ्याच्या सिझनमध्ये थंडगार, शीतपेय विकणाऱ्या व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहेत. विशेष म्हणजे हे पॅकेट्स नामांकित कंपनीचे असून यामध्ये वनस्पती तेल आणि फॅटचा वापर करण्यात आला असल्याची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आलीय. या कारवाईच्या घटनेनं एकच खळबळ उडाली आहे.

अन्नसुरक्षा आणि मानदे कायद्यानुसार आईस्क्रीम आणि कुल्फी या दुग्धजन्य पदार्थांमध्ये कोणत्याही प्रकारचे वनस्पती तेल किंवा फॅट वापरण्यास सक्त मनाई आहे. मात्र, तपासणी दरम्यान संबंधित कुल्फींमध्ये अशा घटकांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्याची माहिती अन्न सुरक्षा अधिकारी राजेश बडे यांनी दिली. अधिकारी बडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनमार्फत उत्पादीत आणि पुरवठा होणार्या कुल्फींमध्ये भेसळ होत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार, शहरातील वितरकांना माल पुरवठा करणार्या वाहनाची तपासणी करण्यात आली. त्यावेळी कुल्फीचा साठा आढळून आला आणि तो तात्काळ जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित कंपनीला खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून, नियमभंग सिद्ध झाल्यास कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

# मतदारसंघांची फेररचना करून सत्ता काबीज करण्याचा डाव

**राहुल गांधींचा केंद्र सरकारवर हल्लाबोल**

**संसदेच्या विशेष अधिवेशनात संघर्षाची चिन्हे**

## लोकसभेतील जागा ८५० करण्याच्या प्रस्तावास 'इंडिया' आघाडीचा कडाडून विरोध

नवी दिल्ली : केंद्र सरकारने लोकसभेची सदस्यसंख्या ५४३ वरून ८५० करण्याच्या हालचाली सुरू केल्या असून, या प्रस्तावावर विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. मतदारसंघांची सोयीस्कर फेररचना करून सत्ता काबीज करण्याचा हा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे, असा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी झालेल्या 'इंडिया' आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत या विधेयकांविरोधात एकजूट होण्याचा निर्णय घेण्यात आला.



राहुल गांधी यांनी स्पष्ट केले की, या नव्या प्रस्तावाचा महिला आरक्षणाशी कोणताही संबंध नसून, हा केवळ राजकीय हेतूने केलेला फेरबदल आहे. आम्ही ओबीसी, दलित आणि आदिवासींचा वाटा चोरू देणार नाही. तसेच दक्षिण भारत, ईशान्य आणि लहान राज्यांवर अन्याय होऊ देणार नाही, असे ते म्हणाले. जर खरोखरच महिला आरक्षण लागू करायचे असेल, तर ते आत्ताच अंमलात आणा आणि त्यात ओबीसी आरक्षणाचा समावेश करा, अशी मागणीही त्यांनी केली.

टीव्हीकेचे अध्यक्ष विजय आणि आरएसपीचे खासदार एन. के. प्रेमचंद्रन यांनी या परिसीमन विधेयकामुळे उत्तर आणि दक्षिण भारतातील प्रतिनिधित्वामध्ये मोठी तफावत निर्माण होईल, अशी भीती व्यक्त केली. उत्तर भारतातील जागा वाढतील, मात्र दक्षिण भारताचे महत्त्व कमी होईल, जे लोकशाहीसाठी घातक असल्याचे त्यांनी नमूद केले.

**संसदेचे विशेष अधिवेशन गाजणार**

सरकार १६ ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावणार आहे. यात संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, परिसीमन (दुरुस्ती) विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे विधेयक मांडले जाणार आहे. मल्लिकार्जुन खरगे यांनी जाहीर केले की, संपूर्ण विरोधी पक्ष या 'सापळा' असलेल्या विधेयकांविरुद्ध मतदान करेल. बैठकीला शिवसेना (यूबीटी), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), आप, टीएमसी आणि आरजेडीचे दिग्गज नेते उपस्थित होते.

# संपादकीय

## कॉर्पोरेट संस्कृतीचा 'बुरखा'

बहुराष्ट्रीय कंपन्या, चकचकीत कार्यालये, हातात लॅपटॉप आणि आधुनिक जीवनशैली... हे चित्र आजच्या तरुणाईसाठी यशाचे शिखर मानले जाते. परंतु, नाशिकमधील 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' सारख्या प्रतिष्ठित कंपनीत जे काही घडले, त्याने या चकाकीमागचा अंधार जगासमोर आणला आहे. धर्मांतराचा पद्धतशीर कट, महिलांचा लैंगिक छळ आणि उच्चशिक्षित कर्मचाऱ्यांची झालेली वैचारिक दिशाभूल हे केवळ गुन्हे नसून, आपल्या समाजव्यवस्थेच्या ढासळत्या मानसिकतेचे लक्षण आहे. शिक्षणाने माणूस खरोखर सुसंस्कृत होतो का? हा प्रश्न या निमित्ताने पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

नाशिकच्या या प्रकरणात समोर आलेली माहिती अंगावर शहारे आणणारी आहे. प्रशिक्षणासारख्या पवित्र प्रक्रियेचा वापर करून हिंदू देवतांबद्दल अपमानजनक टिप्पणी करणे आणि आर्थिक किंवा मानसिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या कर्मचाऱ्यांना लक्ष्य करणे, हे एका मोठ्या षडयंत्राचा भाग असल्याचे दिसते. यात केवळ कनिष्ठ कर्मचारीच नाहीत, तर मानवी संसाधन विभागातील निदा खान सारखे वरिष्ठ अधिकारीही सामील असल्याचे पाहून धक्का बसतो.

जेव्हा एखादी संस्था कर्मचाऱ्यांच्या खासगी आयुष्यात, त्यांच्या श्रद्धेत आणि त्यांच्या जीवनशैलीत हस्तक्षेप करू लागते, तेव्हा ती संस्था न राहता एक 'धर्मांतरण केंद्र' बनते. एखाद्या कर्मचाऱ्याने आपल्या घरातील देवदेवतांचे फोटो काढण्यापर्यंत तिची दिशाभूल करणे, ही वैचारिक गुलामीची पराकाष्ठा आहे. व्हॉट्सअॅप ग्रुप्सच्या माध्यमातून चालणारे हे 'मिशन' हे सिद्ध करते की, हे कृत्य चुकून घडलेले नसून ते नियोजनबद्ध होते.

दुसरीकडे, आठ महिला कर्मचाऱ्यांनी केलेला लैंगिक छळाचा आरोप कॉर्पोरेट क्षेत्रातील महिलांच्या असुरक्षिततेवर शिक्कामोर्तब करतो. तक्रार करूनही एचआर विभागाने त्याकडे दुर्लक्ष करणे, हे अधिक गंभीर आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये 'प्रिव्हेंशन ऑफ सेक्सुअल हॅरसमेंट' सारखे कायदे कागदावर असतात, पण प्रत्यक्षात तक्रारदारालाच दबावाखाली आणले जाते, हे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे.

अशोक खरात प्रकरण असो किंवा अमरावतीमधील १९ वर्षीय तरुणाने तरुणींचे व्हिडिओ बनवून केलेले ब्लॅकमेलिंग; या सर्व घटनांमागे एकच समान धागा आहे 'स्त्रीकडे पाहण्याचा विकृत दृष्टिकोन'. उच्चशिक्षित समाजातही जर महिलांना अशा प्रकारच्या मानसिक आणि शारीरिक छळाला सामोरे जावे लागत असेल, तर आपल्या शिक्षण पद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे राहते. पदव्या मिळवणे म्हणजे सुशिक्षित होणे नव्हे, हे आजच्या काळातील सर्वात मोठे सत्य आहे.

आपण अशा युगात जगत आहोत जिथे तंत्रज्ञान प्रगत झाले आहे, पण मानवी मूल्ये रसातळाला गेली आहेत. टीसीएस सारख्या कंपनीत काम करणारा तरुण जर धर्मांतराच्या बेकायदेशीर कृत्यांसाठी पैसे घेत असेल किंवा सहकाऱ्याचा छळ करत असेल, तर त्याच्या शिक्षणाचा उपयोग काय? अमरावतीमधील घटना तर अधिक भयानक आहे. एका १९ वर्षांच्या मुलामध्ये इतकी विकृती येते कुठून? सोशल मीडियाचा गैरवापर आणि झटपट प्रसिद्धी किंवा सत्तेची हाव तरुणाईला गुन्हेगारीच्या गर्तेत ढकलत आहे.

या प्रकरणात पोलिसांनी विशेष तपास पथक स्थापन करून योग्य पाऊल उचलले आहे. बँक खात्यांची चौकशी आणि व्हॉट्सअॅप चॅट्सचा तपास या प्रकरणातील आर्थिक लागेबांधे उघड करेलच. परंतु, केवळ कायदेशीर कारवाई पुरेशी नाही. शासनाने आता केवळ आर्थिक ऑडिटवर भर न देता, कंपन्यांच्या अंतर्गत कार्यसंस्कृतीचे सामाजिक ऑडिट करणे गरजेचे आहे. कर्मचाऱ्यांनीही सावध राहणे आवश्यक आहे. नोकरी म्हणजे केवळ पगार मिळवण्याचे साधन नाही, तिथे आपल्या स्वाभिमानाशी आणि श्रद्धेशी तडजोड होता कामा नये. समाजातील सजग नागरिकांनी अशा प्रकरणांविरुद्ध आवाज उठवायला हवा. जेव्हा प्रशासनातील सक्षम महिला बळी पडतात, तेव्हा सामान्य महिलांच्या सुरक्षेचे काय? हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. नाशिक आणि अमरावतीच्या या घटना समाजव्यवस्थेच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणाऱ्या आहेत. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा केवळ नारा देऊन चालणार नाही, तर शिकलेल्या मुलींना सुरक्षित वातावरण देणे ही समाजाची नैतिक जबाबदारी आहे. धर्मांतर आणि छळाचे हे विषारी नेटवर्क मुळापासून उखडून टाकण्याची गरज आहे. अन्यथा, आधुनिकतेचा बुरखा घातलेला हा समाज आतून पोखरला जाईल. ही वेळ केवळ आरोपींना शिक्षा करण्याची नाही, तर आपली सामाजिक मूल्ये पुन्हा तपासण्याची आहे.

## घुले पाटील पतसंस्थेला ३८ लाख ९७ हजारांचा नफा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** परिसरातील विश्वासार्ह असणारी पतसंस्था म्हणून नावलौकीक असलेल्या लोकनेते स्वर्गीय मारूतराव घुले पाटील पंतसंस्थेला २०२५-२०२६ सालच्या आर्थीक वर्षात सुमारे ३८ लाख ९७ हजार रूपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती घुले पाटील पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नंदकुमार पाटील यांनी दिली. सध्या संस्थेकडे ६७ कोटी ५३ लाख रुपयांच्या ठेवी असून ४७ कोटी ५५ लाख रूपयांचे कर्ज वितरण आतापर्यंत करण्यात आलेले आहे. पतसंस्थेच्या वतीने विविध ठिकाणी २३ कोटी ८९ लाख रूपयांची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. संपुर्ण संगणीकृत कामकाजासह विज बिल भरणा केंद्र चालवले जात आहे. संस्थेची एकूण उलाढाल ७८ कोटी ५१ लाख रुपये असून पतसंस्थेने नवोदीत व्यावसायिकांना सहज सुलभ कर्ज वितरण केल्याने बाजारपेठेत या व्यावसायीकांची पत निर्माण झाली आहे. आर्थीक व्यवहारा बरोबरच संस्थेने सामाजिक बांधीलकी जपण्याचे काम केले आहे. लोकनेते स्व. मारुतराव घुले पाटील पतसंस्थेच्या २२ वर्षाच्या यशस्वी वाटचालीत सर्व संचालक, सभासद, कर्मचारी, ठेवीदार, कर्जदार, कलेक्शन प्रतिनिधी यांच्या सहकार्यामुळे व खंबीर पाठबळामुळे यशस्वीपणे वाटचाल सुरू केली असून सभासदांचे हित जोपासून संस्थेला उत्कर्षाकडे नेण्याचा आपला प्रयत्न असल्याचे नंदकुमार पाटील यांनी सांगितले.



## कोपरगावात राष्ट्रवादीकडून महामानवास अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी प्रतिनिधी-** संपूर्ण कोपरगाव मतदार संघात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्याप्रमाणे कोपरगाव शहरात देखील मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात येवून आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रावादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने जयघोष करून परिसर दणाणून सोडला होता. यावेळी समता उद्योग समूहाचे अध्यक्ष काका कोयटे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, बी.एस.एन.एल. चे संचालक रविकाका बोरावके, नगरसेवक मंदार पहाडे, हाजीमेहमूद सय्यद, जनार्दन कदम, संदिप कपिले, इम्तियाज अत्तार, बाळासाहेब रुईकर,



सोमनाथ आढाव, शैलेश साबळे, विजय त्रिभुवन, प्रकाश दुशिंग, सुनिल मोकळ, राजेंद्र वाकचौरे, माजी नगरसेवक विरेन बोरावके, रमेश गवळी, फकीर कुरेशी, सचिन गवारे, डॉ. तुषार गलांडे, दिनकर खरे, संदिप पगारे, अरुण त्रिभुवन, सागर आहेर, दिनेश कांबळे, राजेंद्र उशिरे, शंकर घोडेराव, गौतम आहिरे, राजेंद्र खैरनार, मनोज शिंदे, अविनाश कांबळे, अनिल शिंगाडे, बिपीन त्रिभुवन,अमोल भालेराव, शुभम घोडेराव, रोहन वानखेडे,दिलीप तुपसुंदर, सागर फडे, चंद्रकांत धोत्रे, सुनिलजी बोरा, चंद्रशेखर म्हस्के, जावेद शेख, योगेश वाणी, मनोज कडू, राजेंद्र बोरावके, विजय बागडे, वैभव कानडे, भाऊसाहेब भाबड, प्रशांत मोरे, शुभम लासुरे, हारुण शेख, रविंद्र राऊत, प्रदीप कुऱ्हाडे, संदिप सावतडकर, शिवाजीराव कुऱ्हाडे, बनकर, लक्ष्मण भाटे, मनोज भाटे, सनी पवार, शरीफ सय्यद, राहुल कवडे, राजू पठाण, विजय हलवाई आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भीमशक्ती संघटनेकडून शाळांना पुस्तकांचे वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने राहाता तालुक्यातील विविध शाळांच्या ग्रंथालयांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. जि.प. मुख्य शाळा पोकळे वस्ती, मुजमुले वस्ती तसेच रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल पिंपरी निर्मळ येथे हा उपक्रम राबविण्यात आला. संघटनेचे उपजिल्हाध्यक्ष अनिल गायकवाड यांनी स्वखर्चातून पुस्तके देऊन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मूलमंत्र आजही तितकाच प्रेरणादायी आहे. नवीन पिढीने महापुरुषांचे विचार समजून घेतले तरच समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल. या पुस्तकांमधून विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज आणि अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची प्रेरणा मिळणार असून वाचन संस्कृती वाढीस लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप वाघमारे व संतोष कदम यांनी केले. यावेळी समता जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संदेश गायकवाड, खजिनदार पवन गायकवाड तसेच विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पदाधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुकाण्यात आमदार लंघे यांच्या हस्ते महामानवाला अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**भेंडा :** कुकाणा येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध धर्मीय नागरिकांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर व क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी बोलताना आमदार लंघे यांनी डॉ. आंबेडकर यांनी समाजाला दिशा देत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र दिला असून त्यांच्या विचारांवर चालत समाजात शांतता व एकोपा राखण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संत ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक देसाई आबा देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमास आम आदमी पक्षाचे नेते संजूभाऊ सुखदान, सरपंच लताताई अभंग, अशोकराव मंडलिक, विष्णुपंत पवार, नगरसेवक सुरेंद्रभाऊ थोरात, वंचित महिला आघाडीच्या ललितताई ठोंबरे, पोपटराव सरोदे, सादिकभाई शिलेदार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निल क्रांती मित्रमंडळ व जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, परिसरातील तरवडी, अंतरवाली, चिलेखनवाडी, जेऊर हैबती, नांदूर, पाथरवाले आदी गावांतील जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायत कार्यालयांमध्येही डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

## समाज परिवर्तनासाठी आंबेडकर विचारांची गरज : ललित मोटे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील वडाळा बहिरोबा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच ललित मोटे यांनी समाज परिवर्तनासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांची आज खरी गरज असल्याचे प्रतिपादन केले. ग्रामपंचायत सभागृहात झालेल्या कार्यक्रमात पोपटराव कांबळे यांनी प्रास्ताविक केले. सरपंच ललित मोटे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांनी बाबासाहेबांचे भारतीय राज्यघटनेतील योगदान, महाड चवदार तळे सत्याग्रह तसेच बौद्ध धम्म दीक्षेचा इतिहास यावर प्रकाश टाकला. विश्वनाथ शेळके यांनी आंबेडकरांचे अर्थव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांवरील विचार मांडले. तर विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे समन्वयक संतोष तेलतुंबडे यांनी धरण प्रकल्प, कामगार व महिला हक्क तसेच बाबासाहेबांची दूरदृष्टी यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपसरपंच सचिन मोटे, नानासाहेब मोटे, अशोक कांबळे, सागर तेलतुंबडे, ग्रामविकास अधिकारी ज्ञानदेव शिंदे, पोलीस उपनिरीक्षक माळवे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राहुरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंती उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती राहुरी शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. चार दिवस विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १४ एप्रिल रोजी सकाळी राजवाडा येथील समाज मंदिरात उत्सव समितीचे अध्यक्ष विलास नाना साळवे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शहरातील विविध भागांतही जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडले. जयभीम मित्र मंडळाच्या वतीने परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दि. ८ ते १४ एप्रिल दरम्यान भिम गीतांचा कार्यक्रम, राज्यस्तरीय भिम काव्य स्पर्धा, महात्मा फुले जयंतीनिमित्त व्याख्यान, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम, महाआरोग्य शिबिर, निबंध, वक्तृत्व व नृत्य स्पर्धा तसेच वृद्धाश्रमात फळ व मिठाई वाटप असे विविध उपक्रम राबविण्यात आले. जयंतीदिनी मानवंदना कार्यक्रमात माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, तहसीलदार अमित पवार, पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मौलाना आझाद नगर येथे मुस्लिम बांधवांनीही अभिवादन केले. सायंकाळी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक शांततेत पार पडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयभीम मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भारतरत्न डॉ. आंबेडकर याच्या जयंतीनिमित्त अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५ व्या जयंतीनिमित्त श्रीरामपूर शहर भीम जयंती उत्सव समितीचे वतीने पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष डॉ. राजीव साळवे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून, भागाच्या माजी नगरसेविका अनिता ढोकने, वकील संघाचे ॲड. सुभाष जंगले, अशपाक शेख, रवींद्र हरार सचिन शरणागत सागर कांबळे, रामदास ढोकणे, जय श्रीराम संघाचे सुनील मस्के, सिद्धार्थ नगर मधील असंख्य महिला पुरुष उपस्थित होते.

यावेळी माजी नगरसेवक प्रकाश ढोकणे म्हणाले की भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून भूतलावरील तमाम समाजाला न्याय दिला आहे, विश्वामध्ये परमपूज्य बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली भारतीय राज्यघटना सर्वश्रेष्ठ ठरली आहे. शिका,संघटित व्हा,संघर्ष करा या मूलमंत्रांचे पालन अवलोकन समाजातील प्रत्येक घटकांनी करावे असे प्रतिपादन माजी नगरसेवक प्रकाश ढोकणे यांनी केले आहे. यावेळी उपस्थित बंधू भगिनींचे आभार रवींद्र हारार यांनी मानले.



## मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव :** महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मूकबधिर विद्यालय, अपंग सामाजिक विकास संस्था श्रीरामपूर, आसान दिव्यांग संघटना महाराष्ट्र आणि रोटरी क्लब श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देविदास कोकाटे यांनी सांगितले की, अशा स्पर्धांमुळे मूकबधिर विद्यार्थ्यांना आपले कौशल्य दाखवण्यासाठी व्यासपीठ मिळते व त्यांच्या सुप्त गुणांना चालना मिळते. मैदानावर विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंद या स्पर्धेच्या यशाचे द्योतक ठरले. कार्यक्रमाला रयत शैक्षणिक संकुलच्या अध्यक्षा मीनाताई जगधने, रोटरी एज्युकेशन ट्रस्टचे सचिव नारायण पटेल, खजिनदार विनोद पाटणी, रोटरी क्लब अध्यक्ष उद्धव तांबोळी, सचिव सरबजीत सिंग चुग, वर्षा गायकवाड, डॉ. दिलीप पडघन, डॉ. भारत गिडवणी, डॉ. अजित घोगरे आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत पंच म्हणून विकास यादव, मयूर ओमने, ओम मुळे, शुभम कांदळकर यांनी काम पाहिले. मराठी समालोचन संजय साळवे तर इंग्रजी समालोचन सहर्षा साळवे यांनी केले. राज्यभरातून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय साळवे यांनी केले, तर आभार संतोष जोशी यांनी मानले.

## दुष्काळाची चाहूल व खरीप हंगाम, शास्त्रीय विवेचन गरजेचे : डॉ. ढगे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** दुष्काळाची चाहूल व खरीप हंगाम २०२६ करीता शास्त्रीय विवेचन गरजेचे असल्याचे मत कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्त केले

डॉ.ढगे म्हणाले की भारतीय हवामान शास्त्र खात्याने २०२६ खरीप हंगामात एल नॅनो इफेक्ट मुळे दुष्काळाचे संकेत दिले आहेत पाऊसमान ९२टक्के पर्यंत होईल हा अंदाज वर्तविला आहे भारतीय हवामान शास्त्र विभागात अनेक शास्त्रज्ञ व प्रयोगशाळा यावर भरपूर खर्च केला जातो तथापि पाऊसमान अंदाज वर्तविण्यात समाधानकारक यश मिळत नाही ढोबळमानाने अंदाज वर्तविले जातात

खरीप हंगाम २०२६ मध्ये पाऊस कमी होणार असेल तर दुष्काळी पट्ट्यात विशेषतः अहिल्या नगर जिल्ह्यात त्याचा जास्त फटका बसण्याची शक्यता आहे त्यासाठी पूर्वनियोजन अवश्यक आहे पाण्याची बचत व त्यासाठी पाण्याचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन आवश्यक आहे खरीप हंगामात पीक रचनेमध्ये बदल आवश्यक आहे त्यामध्ये कमी कालावधीची व पाण्याची गरज कमी लागणारी पिके घ्यावी लागतील पिकांना पाणी देताना पिकांच्या अत्यंत संवेदनक्षिला अवस्थेमध्ये पाणी द्यावे लागेल.



विशेषतः आधुनिक सिंचन पद्धती वापर करणे अपरिहार्य आहे नवीन तंत्रज्ञानात ड्रोन वापर पाणी व खत बचतीसाठी उपयुक्त ठरू शकेल तसेच एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे त्यामध्ये सेंद्रिय खतांचा वापर वाढविल्यास जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता जास्त होते. जिवाणू खतांचा वापर करणे क्रमप्राप्त आहे. रासायनिक खते जमिनी डरे देण्यापेक्षा ती फवारणीतून दिल्यास परिणामकारक व आर्थिक बचत होईल. पिकांच्या पानातून बाष्पीभवन होते त्यासाठी आठ किलो केओलीन १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करता येईल पाण्याची उपलब्धता विहीर बोरवेल बंधारे याडरे करताना ठिबक सिंचन पद्धतीने करावी लागेल पिकांचा ताण सहन करणारी रासायनिक खते उदाहरणार्थ ऊस कपाशीसाठी सिलिकॉनचा वापर करावा लागेल. जमीन प्रकार हलकी मध्यम भारी यानुसार पीक रचना व पाण्याचा वापर याचा आलेख तयार करावा. त्या वेळापत्रक याप्रमाणे उपयोग करावा लागेल पाण्याचा ताण सहन करणाऱ्या नवीन जातीचा वापर आवश्यक आहे.

पाण्याचा ताण आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने उपाय योजना करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे कृषी खात्यातील अधिकारी तसेच विद्यापीठातील शास्त्रज्ञ व शेतकरी यांचा सुसंवाद वारंवार होण्यासाठी डिजिटल प्रणालीचा वापर परिणामकारक होऊ शकतो. अशा पद्धतीने जमीन पीक पाण्याची उपलब्धता व तत्कालीन उद्भवणारी आपत्कालीन परिस्थिती यावर अभ्यासपूर्ण माहिती तातडीने वेळोवेळी दिल्यास खरीप हंगामातील दुष्काळाची तीव्रता कमी करता येईल असे स्पष्ट प्रतिपादन कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढगे यांनी केले आहे.

## जातेगाव बुद्रुकमध्ये सासऱ्याकडून जावयाला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** जातेगाव बुद्रुक (ता. शिरुर) येथे किरकोळ कारणातून सासऱ्याने जावयाला मारहाण केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे पारीसनाथ आत्माराम पांढरे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जातेगाव बुद्रुक (ता. शिरुर) येथील समाधान तुपकर हे गावी गेलेले असताना त्यांची पत्नी व मुलगा शेजारी राहणारे सासरे पारीसनाथ पांढरे यांच्या घरी गेलेले होते. यावेळी मुलाचे शाळेचे कपडे पांढरे यांच्या घरी राहिल्याने समाधान यांनी सासरे पारीसनाथ पांढरे यांना मुलाचे शाळेचे कपडे आणून द्या असे म्हटले असताना पारीसनाथ यांनी जावई समाधान यांना शिवीगाळ, दमदाटी करत कुलुपाने डोक्यावर मारहाण करत जखमी केले, याबाबत समाधान अशोक तुपकर (वय ३५ वर्षे सध्या रा. जातेगाव बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. गुंज ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी पारीसनाथ आत्माराम पांढरे (रा. जातेगाव बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार गणेश करपे हे करत आहे.

## डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम

### जमादार ग्रुपतर्फे शरबत वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त श्रीरामपूर शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. याच अनुषंगाने जमा मस्जिद परिसरातील 'जमादार ग्रुप'तर्फे नागरिकांसाठी थंड शरबत व ज्यूस वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर भीम जयंतीच्या मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या अनुयायांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी गार पेयांची व्यवस्था करण्यात आली होती. भर उन्हात मिळालेल्या या गारव्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. शरबत व ज्यूस घेण्यासाठी परिसरात मोठी गर्दी झाली होती.



दरवर्षीप्रमाणे यंदाही भीम जयंतीचा उत्साह शहरात मोठ्या प्रमाणात दिसून आला. या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत सेवा करण्याचा प्रयत्न केल्याचे आयोजकांनी सांगितले.

जमा मस्जिद परिसरातील तरुणांनी एकत्र येऊन राबवलेला हा उपक्रम सामाजिक सलोखा व एकात्मतेचा संदेश देणारा ठरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सर्वांपर्यंत पोहोचावेत आणि समाजात सेवा वृत्ती वाढावी, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आल्याचे आयोजकांनी नमूद केले.

## रुई गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी.. !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** रुई (ता. बारामती) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रुई गावात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच गावात निळ्या झेंड्यांनी सजावट करण्यात आली होती. ठिकठिकाणी आकर्षक रोषणाई, स्वागत फलक व बॅनर्समुळे संपूर्ण गावात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. जयंतीनिमित्त रुई येथील बुद्ध विहार येथे त्रिशरण व पंचशील उच्चारत भगवान बुद्धांना वंदन करून पूजा-अर्चा करण्यात आली. बौद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर ग्रामस्थांनी मोठ्या श्रद्धेने बाबासाहेबांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून अभिवादन केले. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी बारामती नगर परिषदेच्या नगरसेविका तथा उपगटनेते संपदा चौधर, प्रा. अजिनाथ चौधर, पत्रकार सुरज देवकाते, रत्नदीप कांबळे, प्रा. बापुराव खाडे, साईनाथ चौधर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांनी दिलेल्या शिक्षण, समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेल्या लढ्याची आठवण करून देत त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन पंचशील तरुण मंडळ व रुई ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमास नगरसेवक विष्णुपंत चौधर, शिवाजी कांबळे, राजेंद्र कांबळे, शरद कांबळे, मच्छिंद्र चौधर, बाबासाहेब चौधर, मधुकर शिरसाट, दत्तात्रय चौधर, मुख्याध्यापिका कांबळे मॅडम, शिक्षकवृंद, महिला भगिनी तसेच तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच रुई गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहपूर्ण, प्रेरणादायी व एकात्मतेच्या भावनेतून साजरी करण्यात आली.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचे मूल्य आजही समाजाला दिशा देणारे आहे. सामाजिक न्याय आणि संविधानिक हक्कांची जपणूक करत प्रत्येक घटकापर्यंत विकास पोहोचवणे, हीच त्यांच्या विचारांची खरी अंमलबजावणी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या विचारांना कृतीत उतरवून समताधिष्ठित समाज घडविण्याचा संकल्प करावा. संपदा चौधर (नगरसेविका, बारामती)**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## नेवासा तालुका ऑटो रिक्षा संघटनेतर्फे डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात



**हंडीनिमगाव** : नेवासा तालुका ऑटो रिक्षा संघटनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नेवासा पोलीस स्टेशनचे निरीक्षक पी.आय. महेश पाटील, नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा शालिनीताई संजय सुखदान, माजी नगरसेवक सचिन नागपुरे, सलीम भाई अल्ताफ पठाण, बापूसाहेब कापरे यांच्यासह व्यापारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली. रिक्षा संघटनेचे अध्यक्ष भरत वालतुरे, सचिव योगेश काळे, उपाध्यक्ष गंगाराम नवसे तसेच रिक्षाचालक सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन मोहन जाधव, सचिन मस्के व सुनील काळे यांनी केले. यावेळी सामाजिक एकात्मतेचा संदेश देत उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## माळवाडगांवात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**माळवाडगांव** : येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. फटाक्यांचा आतषबाजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे प्रमुख पाहुण्यांचे हस्ते पुजन करण्यात आले. प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनावर भाषण, नत्यगीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी माळवाडगांव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ उमेश लोंढे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मुंतोडे, ग्रामविकास अधिकारी दुधाळ, पोलीस हे.कॉ. शेख, ग्रामपंचायतीचे उपसरपंच शाम आसने, सदस्य सुरेश आसने, विठ्ठलराव आसने, उत्तमराव आसने, नानासाहेब आसने, रावसाहेब काळे, जगदिश मोरे, आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सचिन नरोडे,तान्हा खताळ,अजिम शेख, अनिल कसबे, सोमनाथ नरोडे,शुभम बाबर, सागर कसबे, बाबासाहेब कसबे पप्पू आढाव आदिंनी प्रयत्न केले, सुत्रसंचलन मंगेश साळवे यांनी तर आभार किरण नरोडे यांनी मानले.

# आमदार खताळांकडून 'एजंटगिरी'चा पर्दाफाश

## तलाठी कार्यालयातील गंभीर प्रकार उघडकीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : शहरातील चावडी येथील तलाठी कार्यालयात शासकीय कामकाजात गंभीर अनियमितता उघडकीस आली असून, दिव्यांग व वयोवृद्ध नागरिकांकडून पैसे उकळले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. मात्र, संबंधित महिलेने आमदार अमोल खताळ यांना मोबाईलवर मेसेज केल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष तेथे जाऊन 'एजंटगिरी'चा पर्दाफाश करत वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारवाईच्या सूचना दिल्या. चावडी येथील तलाठी कार्यालयात दिव्यांग व वयोवृद्ध नागरिकांना कामासाठी वारंवार हेलपाटे मारायला लावले जात असून, ठिकठिकाणी अडवणूक करून पैसे मागितले जातात, अशी आमदार खताळ यांना एका महिलेने व्हाट्सअपद्वारे माहिती दिली.

विशेष म्हणजे, या कामकाजात खाजगी व्यक्तींचा सहभाग असल्याचा आरोपही करण्यात आला. या तक्रारीची दखल घेत आमदार खताळ यांनी तत्काळ संबंधित ठिकाणी धाव घेतली. मात्र, तेथे पोहोचल्यावर तलाठी व कोतवाल कोणीच हजर नसल्याचे दिसून आले. त्याऐवजी मन्सूर शेख हा व्यक्ती तेथे बसून शासकीय कागदपत्रे हाताळत असल्याचे आढळले. यावेळी आतमध्ये उपस्थित असलेल्या आणखी एका व्यक्तीला विचारणा केली असता, मी मन्सूर शेख यांचा जावई आहे, असे उत्तर देण्यात आले. यावर आमदारांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत, तुम्हाला येथे बसण्याचा अधिकार कोणी दिला? असा जाब विचारला. त्यावर तलाठी उपस्थित नसल्याने आम्हीच काम पाहत होतो, असे उत्तर देण्यात आले.



या गंभीर प्रकारानंतर आमदार खताळ यांनी प्रांताधिकारी अरुण उंडे व तहसीलदार धीरज मांजरे यांना तत्काळ फोन करून संबंधित तलाठ्यावर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. शासकीय कागदपत्रांची पडताळणी खाजगी व्यक्तींमार्फत होणे हा अत्यंत गंभीर व बेकायदेशीर प्रकार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सूचना मिळताच प्रशासनाने नायब तहसीलदार भांगरे यांना घटनास्थळी पाठवले. त्यानंतर संबंधित दोघांवर कारवाई करण्यात आली असून, त्यांना पुढे त्याठिकाणी बसू न देण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणामुळे महसूल विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### एका मेसेजवर तत्काळ 'ॲक्शन'

सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणींची जाण ठेवणारे आमदार अमोल खताळ यांनी पुन्हा एकदा आपल्या संवेदनशीलतेची प्रचिती दिली. एका महिलेने केलेल्या साध्या मोबाईल मेसेजची त्यांनी केवळ दखलच घेतली नाही, तर त्या मागील वेदना ओळखत तात्काळ प्रत्यक्ष घटनास्थळी धाव घेतली.कोणताही वेळ न दवडता त्यांनी थेट तलाठी कार्यालयात जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला आणि सुरू असलेल्या गैरप्रकारांवर तात्काळ कारवाई केली. आजच्या काळात सामान्य माणसाचा आवाज ऐकणारा आणि त्यावर त्वरित कृती करणारा लोकप्रतिनिधी मिळणे दुर्मिळ झाले आहे. अशा परिस्थितीत एका मेसेजवर दिलेला हा प्रतिसाद नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण करणारा ठरला आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेतून त्यांच्या या कृतीचे मोठ्या प्रमाणात स्वागत होत असून, आपला माणूस अशी भावना अधिक दृढ होताना दिसत आहे.

## एसआयआर प्रक्रिया पारदर्शक राबविण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनई** : मतदार यादी दुरुस्तीसाठी सुरू असलेली एसआयआर प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्षपणे राबविण्याची मागणी काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने नेवासा तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली. देशभरात सुरू असलेल्या या प्रक्रियेत काही समाजांच्या मतदारांची नावे जाणीवपूर्वक वगळली जात असल्याचा संशय व्यक्त करत संघटनांनी आक्षेप नोंदवला. याबाबत नेवासा तालुक्यातील प्रक्रिया पारदर्शीपणे पार पाडावी, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, मतदार यादीतून नाव वगळण्यापूर्वी आधार, मतदान ओळखपत्र व अन्य पुराव्यांची सखोल पडताळणी करावी. तसेच नाव वगळल्यास संबंधित व्यक्तीस लेखी कारण देणे बंधनकारक असावे. वगळलेल्या नावांची माहिती ग्रामपंचायतीला देऊन ती ग्रामसभेत मांडावी, अशीही मागणी करण्यात आली. याशिवाय, मतदार यादीतील दुबार नोंदी, चुकीचे घर क्रमांक, अपूर्ण नावे यांची तातडीने दुरुस्ती करावी. नव्या मतदारांचा समावेश करताना कोणताही पात्र नागरिक वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही निवेदनात नमूद आहे. यावेळी वंचितचे पोपटराव सरोदे यांनी प्रक्रियेत त्रुटी आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याचा इशारा दिला. काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी मतदार हक्काच्या संरक्षणासाठी जनतेने सजग राहण्याचे आवाहन केले. निवेदनावेळी अंजुम पटेल, संदीप क्षीरसागर, गणपत मोरे, हरीश चक्रनारायण यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## पो.नि. नितीन देशमुख यांची बदली करा

### देवकर यांची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या कार्यकाळात शहरात गुन्हेगारीने थैमान घातले असून, गुन्हेगारांवर त्यांचा वचक राहिलेला नाही. उलट, गुन्हेगारांना पोलीस ठाण्यात सन्मानाची वागणूक दिली जात असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख राजेंद्र देवकर यांनी केला आहे. देशमुख यांची तातडीने इतरत्र बदली करावी, या मागणीसाठी त्यांनी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन पाठवले आहे.

निवेदनात देवकर यांनी नमूद केले की, पीआय देशमुख हजर झाल्यापासून शहरात खून, बलात्कार, घरफोडी, अमली पदार्थ आणि अवैध शस्त्रांची विक्री यांसारख्या गुन्ह्यांत मोठी वाढ झाली आहे. रामनवमी उत्सवात हिंदू बांधवांवर झालेल्या दगडफेकीच्या घटनेवेळी पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली. शहरात अवैध धंदे जोमाने सुरू असून, तक्रार देण्यासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांना असभ्य वागणूक दिली जाते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. पोलीस निरीक्षक देशमुख जोपर्यंत श्रीरामपुरात आहेत, तोपर्यंत कायदा-सुव्यवस्था अबाधित राहू शकत नाही.

नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास उडाला आहे, असे देवकर यांनी म्हटले आहे. प्रशासनाने या निष्क्रिय अधिकाऱ्याची हकालपट्टी न केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# सोनगावात डॉ.आंबेडकर जयंती उत्साहात

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोनगाव पंचक्रोशीतील भीमनगर परिसरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरणात जयंती साजरी करण्यात आली. निळ्या ध्वजांनी सजलेल्या परिसरात 'जय भीम'च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले. भीमनगर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमास सौ. धनश्रीताई विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सकाळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना वही व पेन वाटप करून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी त्रिशरण व पंचशील ग्रहण करून समतेचा आणि बंधुतेचा संदेश दिला. तसेच मंडळाच्या वतीने ग्रामस्थांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. विविध मान्यवरांनी डॉ.आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारांचा आढावा घेत समाजातील समतेची जाणीव अधिक दृढ करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष मोहित ब्राम्हणे, उपाध्यक्ष संतोष ब्राम्हणे, खजिनदार सुशील ब्राम्हणे,ग्रामपंचायत सदस्य राजन ब्राम्हणे यांच्यासह सरपंच, उपसरपंच, प्रवरा कारखान्याचे संचालक, सोसायटी पदाधिकारी, तसेच भाऊसाहेब पगारे, कुंदन आरवडे, विकी राक्षे, रमेश पलघडमल, अनिल पलघडमल, राजू ब्राम्हणे आदींसह महिला, युवक व सर्वधर्मीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब वाघमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजन ब्राम्हणे यांनी मानले.

## बोरावके कॉलेजमध्ये मेडिकल फिजिक्स व रेडिएशन सेफ्टी कोर्सचा समारोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर येथील भौतिकशास्त्र विभागातर्फे मेडिकल फिजिक्स व रेडिएशन सेफ्टी या विषयावरील दोन महिन्यांच्या शॉर्ट टर्म कोर्सचा समारोप मेडिकल कॅम्प व पोस्टर प्रेझेंटेशनच्या माध्यमातून उत्साहात पार पडला. हा उपक्रम साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्टच्या गंगाधर ओगले हॉस्पिटल यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. समारोप कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्य मीनाताई जगधने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच डॉ. शितल हिवरकर यांची उपस्थिती होती.

आपल्या अध्यक्षीय भाषणात मीनाताई जगधने यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य साक्षरता वाढून समाजात जागरूकता निर्माण होते, असे सांगितले. कोर्सदरम्यान विद्यार्थ्यांना सीपीआर ट्रीटमेंट, एक्स-रे नालिसिस, रेडिओथेरपी यांसारख्या आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानातील किरणोत्सर्गाच्या तत्त्वांची सखोल माहिती देण्यात आली. कॅन्सर व रेडिएशनविषयी जनजागृतीसह मेडिकल फिजिक्स क्षेत्रातील करिअर संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विशेषतः रेडिएशन सेफ्टी ऑफिसर (ठडज) पदाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. समारोपदिनी विद्यार्थ्यांनी बीएमआय व बीपी मोजमाप, सीपीआरचे प्रात्यक्षिक तसेच कॅन्सर जनजागृती, मेडिकल फिजिक्समधील करिअर, एक्स-रे नालिसिस आदी विषयांवर पोस्टर सादर करून आपले ज्ञान प्रभावीपणे मांडले. प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे यांनी विभागाच्या उपक्रमाचे कौतुक करत साखर कामगार हॉस्पिटलचे डॉ. रवींद्र जगधने व त्यांच्या टीमचे आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सोनल कोल्हे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. पूजा वमणे यांनी केले. या कोर्समध्ये १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. पी. एस. जाधव यांच्यासह प्राध्यापकांनी मोलाचे सहकार्य केले.

## रिपाई आठवले महिला आघाडीचेवतीने डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : रिपाई महिला आघाडी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महिला एकता समिती यांच्या वतीने काम भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ व्या जयंती मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. यावेळी रिपाईच्या उत्तर महाराष्ट्र महिला आघाडी प्रमुख रमादेवी धीवर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर शहर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, ड. मिलिंद धीवर हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी उज्वला येवलेकर, पुनम जाधव, सुनिता वडणे, मुमताज सय्यद, अनितताई नरोडे, पत्रकार शेख अहमद नसीर, काजल धीवर, पुष्पाताई हरदास आधी उपस्थित होते. यावेळी समितीचे प्रसिद्धीप्रमुख ड. मिलिंद धीवर यांनी सांगितले की, याही वर्षी दि. २१ एप्रिल रोजी संध्याकाळी आंबेडकर पुतळ्यासमोर भीम गीतांचा इंडियन आयडल व कलर्स फ्रेम अविनाश कदम व महागाई गायत्री शेलार यांचा कार्यक्रम व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण आयोजित केलेला आहे याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले.

## आंबेडकर जयंतीनिमित्त ॲम्बुलन्स सेवेचे लोकार्पण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय दलित पँथर व राजू खरात मित्र मंडळाच्या वतीने संगमनेर येथे म्बुलन्स सेवेचे लोकार्पण करण्यात आले. संगमनेर हायटेक बस स्थानक परिसरात आयोजित अभिवादन कार्यक्रमात महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी आमदार सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, राजू खरात, विश्वासराव मुर्तडक, सिताराम राऊत, प्रवीण गायकवाड, रवी गिरी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मंत्री थोरात म्हणाले की, डॉ. आंबेडकर यांनी देशाला दिलेली राज्यघटना व समतेचा विचार हा जगासाठी मार्गदर्शक ठरला आहे.

लोकशाही व संविधान हे देशाचे आधारस्तंभ असून त्यांचे जतन करण्याची जबाबदारी युवकांनी घ्यावी. त्यांनी गरीब व शोषितांच्या हक्कांसाठी दिलेला लढा प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. आमदार सत्यजित तांबे यांनी सांगितले की, शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा तसेच डॉ. आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याची योजना आहे. डॉ. जयश्रीताई थोरात यांनी म्बुलन्स सेवेच्या माध्यमातून गरजू नागरिकांना तात्काळ वैद्यकीय मदत मिळणार असल्याचे सांगितले. राजू खरात यांनी गोरगरीबांच्या सेवेसाठी ही सुविधा सुरू केल्याचे नमूद करत सामाजिक एकजुटीचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण गायकवाड यांनी केले तर रवी गिरी यांनी आभार मानले.

## बेलकरवाडीच्या ६० व्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ताहाराबाद** : गोपाला-गोपाला, देवकीनंदन गोपाला तसेच ज्ञानोबा-तुकारामांच्या जयघोषात प्रतिपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र ताहाराबाद येथील बेलकरवाडीमध्ये भरलेल्या ६० व्या फिरत्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने मोठ्या उत्साहात सांगता झाली.

यावेळी भाविकांची लक्षावधींची उपस्थिती लाभली होती. गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या सप्ताहात वैष्णवांचा मोठा मेळा जमला होता. हरिनामाचा गजर, भगव्या पताका आणि भक्तीरंगाने बेलकरवाडी परिसर भारून गेला होता. वरुणराजाने साथ दिल्याने भाविकांची विक्रमी गर्दी झाली.

काल्याच्या कीर्तनानंतर भाविकांनी समाधानाने परतीचा प्रवास सुरू केला. श्री संत कवी महिपती महाराज पायी दिंडी सोहळ्याचे उपाध्यक्ष महंत बाळकृष्ण महाराज कांबळे यांचे काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनात त्यांनी भगवंताच्या विविध लीला सांगत भाविकांना मंत्रमुग्ध केले. देवस्थानच्या विकासासाठी भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. महिपती महाराजांची कर्मभूमी आणि 'भक्तविजय' ग्रंथाची जन्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेलकरवाडी येथे सप्ताहादरम्यान अन्नदान व ज्ञानदानाचा यज्ञच पार पडला. दुष्काळी पट्ट्यातील या भागात मोठ्या प्रमाणावर अन्नदान झाल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले. द्वादशीच्या पर्वणीत काल्याचे कीर्तन आणि नयनरम्य दहीहंडी सोहळा पार पडला.

यावेळी संत-महंत, देवस्थानचे विश्वस्त, ग्रामस्थ व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी सप्ताहाचे उत्कृष्ट नियोजन केले होते. महाप्रसादाने सप्ताहाची सांगता करण्यात आली.

> ताहाराबाद क्षेत्र दक्षिण काशी आहे. येथील मातीचा कणकण पवित्र आहे. कारण येथे साक्षात पांडुरंग येतात, ही मोठी लीला आहे! पांडुरंगाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत ज्ञानदानाचा व अन्नदानाचा महायज्ञच संपन्न झाला! देवस्थान 'क' वर्गामधून 'ब' वर्गात समाविष्ट करण्यासाठी देवस्थान समिती प्रयत्नशील आहे. अखंड हरिनाम सप्ताहाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. पुढील वर्षाचे सप्ताहाचे नारळ पांडुरंग महोत्सवात दिले जाईल.
>
> **अर्जुन महाराज तनपुरे, मठाधिपती, श्री क्षेत्र ताहाराबाद**

## मक्तापुर-म्हसले रस्ता प्रश्न पेटला

## निवडणूक बहिष्काराचा इशारा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नेवासा तालुक्यातील मक्तापुर-म्हसले रस्त्याच्या प्रश्नांसाठी मराठा सुकाणू समितीचे प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. आंबेडकर जयंती दिनी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

तर रस्ता न झाल्यास मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचा ठराव ग्रामस्थांनी केला आहे. रास्तारोको प्रसंगी युवा नेते गणेश झगरे म्हणाले, म्हसले मक्तापूर गावच्या रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. अनेकवेळा दोन्ही गावच्या नागरिकांना घेऊन आपण निवेदने दिली मात्र हया रस्त्याच्या प्रश्नाकडे सतत प्रशासनाने दुर्लक्षच केले. आता याबाबत नेवासा तालुक्याच्या लोकप्रतिनिधीने विशेष लक्ष घालून या रस्त्यासाठी तरतूद करावी तसेच या रस्त्याचा कामासाठी विशेष लक्ष द्यावे अशी मागणी केली.

सदरचा रस्ता न झाल्यास येत्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत म्हसले व मक्तापूर गावच्या ग्रामस्थांच्या वतीने ग्रामस्थ बहिष्कार टाकणार असा ठराव ग्रामस्थांनी घेतला असल्याचे गणेश झगरे यांनी सांगितले.

आंदोलन प्रसंगी आंदोलन नेतृत्व करणारे गणेशभाऊ झगरे यांच्या समवेत गोरख नवघरे,रितेश साळवे,भानुदास शिरसाठ, पूनमचद साळवे,संभाजी शिरसाठ,दत्ता गव्हाणे,अनिल साळवे,दत्ता शिरसाठ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## पान १ वरुन

### १८० तरुणींचे लैंगिक शोषण : आयान अहमदसह चौघांना बेड्या

काम न करणारा 'रोड रोमिओ'. महागड्या कारमधून फिरणे आणि मोबाईलवर रील बनवणे हाच त्याचा दिनक्रम होता, अशी माहिती समोर आली आहे. त्याच्याकडे महागड्या गाड्या कोठून येत होत्या, याचीही चर्चा आता रंगली आहे.

अयान अहमदच्या वडिलांचा जुन्या कार खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. 'ऑटो डील'च्या व्यवसायातूनच त्याच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालतो. यातील महागड्या कार अयान आपले शौक पूर्ण करण्यासाठी वापरत होता, अशी माहिती समोर येत आहे. कार घेऊन भटकंती करणे, तरूणींसमोर बडेजाव दाखवणे, समाज माध्यमांवर संपर्क साधून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढणे आणि नंतर त्यांचे लैंगिक शोषण करणे ही त्याची कार्यपद्धती होती. तरूणींसोबत आक्षेपार्ह व्हिडिओ तयार करण्याचे आणि आपल्या मित्रांसोबत शेअर करण्याचा त्याचा छंद हा वाढला, त्यातूनच तरूणींना ब्लॅकमेल करण्याचे प्रयत्न आरोपी अयानने सुरू केले, अशी माहिती आता समोर येऊ लागली आहे.

आरोपींनी आठ अल्पवयीन मुली आणि महिलांचे १८ व्हिडिओ आणि ३९ फोटो समाज माध्यमांवर प्रसारीत केल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांनी आता या गंभीर गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. आतापर्यंत पीडित किंवा त्यांचे पालक यांपैकी कुणीही पोलिसांत तक्रार देण्यास समोर आले नसले, तरी पोलिसांनी तपासाचा परीघ वाढवला आहे. या गुन्ह्यात आणखी किती लोकांचा सहभाग आहे, याचा शोध घेतला जात आहे. सायबर पोलिसांनीही या प्रकरणाची पाळेमुळे शोधण्याचा प्रयत्न चालवला आहे.

या प्रकरणातील पीडिता व त्यांच्या कुटुंबीयांनी पोलीस प्रशासनातर्फे प्रसारित करण्यात आलेल्या मोबाइल क्रमांकावर संबंधित महिला पोलीस अधिकाऱ्यांशी आपल्या सोयीनुसार संपर्क साधून माहिती द्यावी. सोबतच या प्रकरणाबाबत कुणाला काहीही माहिती असल्यास त्यांनी पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षकांनी केले आहे.

अल्पसंख्यांक आयोगाकडेही तक्रार – महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी नागपूर येथे पत्रकार परिषद घेतली. त्यांनी सांगितले की, अचलपूर-अमरावतीतून महिलांचे शोषण झाल्याची तक्रार त्यांच्याकडे आली. त्यांनी त्या ठिकाणच्या एसपीशी बोलून चौकशी केली. यात आठ मुस्लिम महिलांचे शोषण झाल्याचे पुढे आले. यापैकी ६ महिलांचे फोटो आणि २ महिलांचे व्हिडीओ उपलब्ध आहेत. बाकीचे व्हिडीओ-फोटो आरोपीने डिलीट केले असल्याचे सांगण्यात आले असून, ते रिकव्हर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अल्पसंख्याक आयोगाची टीम आज तिथे जात आहे. यात आणखी संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही सर्व तपास सुरू आहे.

....

### सम्राट चौधरी बिहारचे नवे मुख्यमंत्री

होतील, पण त्यांनी नकार दिला. त्यामुळे जेडीयूने भूमिहार समाजातील विजय चौधरी आणि यादव समाजातील बिजेंद्र यादव यांची निवड केली. हे दोघेही नीतीश कुमार यांचे अत्यंत विश्वासू नेते मानले जातात. मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यानंतर सम्राट चौधरी म्हणाले की, भाजपने मला आयुष्यात सेवा करण्याच्या अनेक संधी दिल्या. मी जवळपास ३० वर्षांपासून राजकारणात कार्यरत आहे. २०१५ पासून मी भाजपसाठी काम करत आहे. पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडली. आता मिळालेली ही मोठी जबाबदारीही मी पूर्ण निष्ठेने निभावेन. त्यांनी पुढे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, पक्षाध्यक्ष जेपी नड्डा, संघटन महासचिव बी. एल. संतोष, शिवराज सिंह चौहान आणि प्रदेशाध्यक्ष संजय सरावगी यांचे आभार मानले. तसेच विकसित भारत या मोदींच्या दृष्टिकोनासह आणि नीतीश कुमार यांच्या समृद्ध बिहार संकल्पासह राज्याचा विकास करू, असेही त्यांनी सांगितले.

....

### भोंदू खरातचे पॉलिटिकल कनेक्शन रडारवर

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. एकनाथ शिंदे यांना अशोक खरातबाबत काहीच माहिती नव्हती. ते मला म्हणाले की, एके ठिकाणी जायचे आहे. अशोक खरातबाबत माहिती असती तर ते तिकडे गेले असते का? असा सवाल राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपस्थित केला.

समता पतसंस्था प्रकरणात जबाब नोंदवले गेले आहेत. अशोक खरात स्वतः अकाउंट उघडायचा आणि ऑपरेट करायचा. अनेक महिलांना फसवण्यात आले. अज्ञानाने घडलेल्या गोष्टी आणि माहिती असून जाणे, यामध्ये फरक आहे. इथून पुढे कोणी भविष्य सांगायला आलं, तर आधी त्याचं भविष्य बघावं लागेल. अंजली दमानिया यांच्याकडे भरपूर माहिती असेल. रोज नवीन प्रकार समोर येत आहेत. जे दोषी असतील, ते मोठ्या पदावर असतील तरी कारवाई झाली पाहिजे, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले.

# नेवासा येथे जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याचा शुभारंभ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** भविष्यातील जलसंकट टाळण्यासाठी पाण्याचा काटकसरीने वापर व जलस्रोतांचे बळकटीकरण अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा'चा शुभारंभ त्यांच्या हस्ते पंचायत समिती सभागृहात झाला.

दि. १५ ते ३० एप्रिलदरम्यान हा उपक्रम राबविण्यात येणार असून, प्रारंभी आमदार लंघे यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व मुळा, प्रवरा, गोदावरी जलकलशाचे पूजन करण्यात आले. यावेळी जलसाक्षरता केंद्राचे जिल्हा समन्वयक सुखदेव फुलारी, गटविकास अधिकारी संजय लखवाल, अंकुशराव काळे, प्रतापराव शिंदे, भाऊसाहेब वाघ, अभिषेक पवार, स्वप्निल देशमुख आदी उपस्थित होते.

आमदार लंघे म्हणाले की, तालुक्याला मुळा, भंडारदरा व जायकवाडी धरणांचे पाणी मिळत असले तरी भविष्यातील गरज लक्षात घेता पाण्याचा जपून वापर आवश्यक आहे. जलयात्रेच्या माध्यमातून जलजागृती घडवून आणण्याचा प्रयत्न होणार असून २६ एप्रिल रोजी ही जलयात्रा नेवास्यात दाखल होणार आहे.

सुखदेव फुलारी यांनी जलसाक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करत जलव्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढविण्याचे आवाहन केले. पाणी वापर संस्थांचे बळकटीकरण, कमी पाण्यात अधिक उत्पादन व जलसंवर्धन हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास मुळा पाटबंधारे विभागाचे बांगर, जितेंद्र कावले, श्रीकांत करंजे, नितीन लांडे, संतोष राऊत, सचिन हिंगे, सागर जाधव, सागर मांडे, विकास चव्हाण, निलेश देहाडराय, बाबासाहेब वारुळे, यादव मनीषा, मीनाक्षी आहिरे, वैशाली पल्हारे, कोमल शिंदे, रश्मी देशमुख, उज्वला वेदपाठक, नवनाथ शिरसाठ यांच्यासह पाणी वापरा संस्थेचे पदाधिकारी, शेतकरी आदि यावेळी उपस्थित होते. गणेश ढाकणे व रावण ससाणे यांनी सूत्रसंचालन केले. नेवासा उपविभागीय अभियंता अभिषेक पवार यांनी आभार मानले. **उस्थळ येथील वरखेड माता पाणी वापर संस्थेमार्फत उत्कृष्ट सिंचन व पाणी पट्टी वसूली बद्दल कालवा निरीक्षक स्वाती साठे तर जगदंबा पाणी वापर संस्थेचे सचिव शशिकुमार भोरे यांचा आ.लंघे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.**



## माहेगाव देशमुखच्या डॉ. पल्लवी गावित्रे यांची एमबीबीएस पदवी पूर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगाव :** कोपरगाव तालुक्यातील माहेगाव देशमुख येथील कु. डॉ. पल्लवी रमेश गावित्रे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस पदवी यशस्वीरित्या संपादन केली आहे. त्यांचे वैद्यकीय शिक्षण डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर येथे पूर्ण झाले. डॉ. गावित्रे यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासात उल्लेखनीय यश मिळवले आहे. दहावी परीक्षेत त्यांनी ९५ टक्के, तर बारावी परीक्षेत ९० टक्के गुण प्राप्त केले. कोरोना काळात २०२० साली कोणत्याही खासगी मार्गदर्शनाविना प्रथम प्रयत्नात नीट परीक्षेत ५१३ गुण मिळवत त्यांनी वैद्यकीय शिक्षणासाठी




पात्रता मिळवली. त्यांच्या या यशामुळे गाव व परिसरात आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजसेवा करण्याच्या त्यांच्या ध्येयासाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.


## शेतकर्यांना त्वरित पिक विमा रक्कम द्या : कृषी मंत्र्यांकडे मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विशेषत: गंगापूर व खुलताबाद तालुक्यात अवकाळी पाऊस व वादळी वार्याने शेतकर्यांचे सन २०२५-२६ हंगामातील खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र अद्यापही शेतकर्यांना संबंधित कंपनीकडून पिक विमा रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे सदरील शेतकर्यांना त्वरित पिक विमा रक्कम देण्यात यावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी कृषी मंत्री मा.ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली. आमदार सतीश चव्हाण यांनी आज (दि.१५) मंत्रालयात कृषी मंत्री मा.ना.दत्तात्रय भरणे यांची भेट घेतली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अवकाळी पाऊस व वादळी वार्याने सन २०२५-२६ हंगामात खरीप पिकाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तहसिल कार्यालयामार्फत या नुकसानीचे पंचनामे देखील झाले.

## निधन वार्ता

### जयवंत जोर्वेकर



**सोनगाव :** सात्रळ येथील विखे कारखान्याचे माजी संचालक जयवंत पुंजाजी जोर्वेकर यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, बहीण भावजई, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार असून अजित जयवंत जोर्वेकर व, डॉ.गोकुळ जयवंत जोर्वेकर यांचे वडील होत.

### गंगाधर तांबे



**लोणी :** राहाता तालुक्यातील दाढ बुद्रुक येथील रहिवासी व पद्मश्री विखे साखर कारखान्याचे माजी कर्मचारी गंगाधर पंढरीनाथ तांबे (वय ६३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ, भावजया असा परिवार आहे. सुजित तांबे यांचे ते वडील तर प्रा. संजय तांबे, प्रा. डॉ. कैलास तांबे यांचे बंधू होत. त्यांचा राज्यपातळीवर हॉलीबॉल संघातही सहभाग होता. पहाटे वडिलांचे निधन झाल्यानंतर दुपारी एक वाजता मुलाचे निधन झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

### रुक्मिणी मुसमाडे



**श्रीरामपूर,** शहरातील वॉर्ड नं. ७, मोरगे वस्ती परिसरातील जेष्ठ महिला रुक्मिणी रायभान मुसमाडे (वय ९५) यांचे दि. १४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुन, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्या भानुदास मुसमाडे यांच्या मातोश्री तसेच देविदास व रामदास मुसमाडे यांच्या चुलती व राहुल व रोहित मुसमाडे यांच्या त्या आजी होत.

## श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुचरित्राचे पारायण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** येथील दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थांच्या मंदिरात सात दिवसाचा नाम जप सप्ताह चालू होता. या कालावधीत सुमारे ३५० महिला व पुरुष मंडळींनी गुरुचरित्राचे पारायण करून काल स्वामी समर्थांच्या पुण्यतिथीनिमित्त पारायणाची सांगता केली. या सात दिवसांच्या कालावधीत दुर्गा सप्तशती आणि खंडेरायांची सप्तशती यांचे नित्य पाठ भाविक भक्त करीत होते. सप्ताह कालावधीत संपूर्ण सप्ताहात विणाकरांचे विणावादन चालू होते. या काळात सुमारे ३५० महिला व पुरुष गुरुचरित्राच्या पारायणासाठी बसले होते. काल श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी निमित्ताने हजारो भाविक भक्तांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले व त्यानंतर सप्ताहाची सांगता होऊन आरती भजन व स्वामींना अभिषेक संपन्न झाल्यानंतर आलेल्या भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



## साईबाबांचा संदेश आजही जगाला मार्गदर्शक : जगताप महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** मानवता हीच खरी जात असून 'सबका मालिक एक' हा साईबाबांचा संदेश आज संपूर्ण विश्वाला अनुभवायला मिळत आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार संजय महाराज जगताप (भऊरकर) यांनी केले. वरूथिनी एकादशीनिमित्त शिर्डी येथील साई मंदिरात आयोजित कीर्तनात ते बोलत होते.

या प्रसंगी जगताप महाराजांनी श्रद्धा आणि सबुरी हा साईबाबांनी दिलेला मंत्र जीवनात अंगीकारण्याचे महत्त्व पटवून दिले. जीवनात यश आणि आत्मिक समाधान मिळवण्यासाठी नामस्मरण अत्यावश्यक आहे. भगवंताच्या नामचिंतनानेच भवसागरातून तरणे शक्य होते, असे त्यांनी सांगितले.

शिर्डी ही पवित्र भूमी



असून साईबाबांनी येथून संपूर्ण जगाला मानवतेचा संदेश दिला. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'तून ज्ञान दिल्याप्रमाणे साईंच्या 'सत्चरित्र'मधूनही समाजाला मार्गदर्शन मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. साईबाबा हे केवळ संत नव्हे, तर भगवंताचे अवतार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कीर्तनानंतर साई संस्थानच्या वतीने जगताप महाराजांचा शाल व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. भाविकांच्या वतीनेही त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास लहू महाराज कराळे, भजनी मंडळे, वारकरी व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कीर्तनानंतर जगताप महाराजांनी साईबाबांच्या समाधी व गुरुस्थानाचे दर्शन घेत आत्मिक समाधान लाभल्याची भावना व्यक्त केली.

## नेवासा एसटी आगारात भीम जयंती साजरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथील एस आगारामध्ये सर्व एस टी कर्मचाऱ्यांनी एकत्रित येत भंडारा कार्यक्रमाद्वारे मिष्टान्न देऊन भीम जयंतीचा उत्सव साजरा केला. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन हिताय बहुजन सुखाय चा मंत्र संविधानाद्वारे मानव जातीला न्याय देऊन जगाला आकर्षित करण्याचे काम केले असल्याचे विचार यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी व्यक्त करण्यात आले.

भीम जयंती निमित्ताने आगार व्यवस्थापक प्रशांत होले, शिव सहकार सेनचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार, प्रवाशी संघटनेचे सचिव पत्रकार सुधीर चव्हाण यांच्या हस्ते प्रतिमेस



पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. चंद्रकांत ढवळे यांची कन्या कु.मनाली ढवळे यांनी भीमगीते गाऊन भीम जयंतीचा आनंद द्विगुणीत केला.

यावेळी ज्ञानेश्वर मुरदारे, रमेश दाणे, अनिल जरे यांनी मनोगताद्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य विषद केले. यावेळी डॉ.आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. कार्यक्रमाला आजी-माजी सेवानिवृत्त चालक-वाहक तसेच अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती लावली. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांच्या वतीने मिष्टान्न भोजन देऊन भीम जयंतीचा आनंद साजरा करण्यात आला.

## गोंडेगावात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गोंडेगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगांव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त यंदाही अन्नदानाचा प्रेरणादायी उपक्रम मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकी जपत पार पाडला. विशेष डिजे न लावता यंदाही अन्नदानाचा प्रेरणादायी हा उपक्रम मागील अनेक सातत्याने राबविला जात असून शाळेत व भिमनगर येथे अन्नदान केले या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे आयोजन राजवाडा मित्र मंडळ, वतीने करण्यात आले होते. सकाळी कार्यक्रमाची सुरुवात आठ वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सुरुवात झाली त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांनी लेझीम पथक ड्रे प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. राजवाडा प्रतिष्ठान येथेही मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आली त्यानंतर शाळेमध्ये विविध मान्यवरांची भाषणे झाली विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम विविध स्पर्धा बक्षीस वितरण व सत्कार समारंभ पार पडला. सालाबाद प्रमाणे बौद्धवाशी शोभा बाबुराव कदम यांच्या स्मरणार्थ शालेय वस्तूचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली गावातील अनेक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.


**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME NAGARE AVINASH AMRUTA ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS AVINASH AMRUT NAGARE (AADHAR NO. 7411 7439 0608) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC LONI PLACE: LONI DATE : 15/04/2026


## महाराष्ट्र पठाण समाज सेवा संघाची स्थापना; अध्यक्षपदी सलीमखान पठाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** मुस्लिम समाजातील पठाण बिरादरीच्या सर्वांगीण विकासासाठी 'महाराष्ट्र पठाण समाज सेवा संघ' या संस्थेची स्थापना करण्यात आली असून अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार व शिक्षक बँकेचे माजी चेअरमन सलीमखान पठाण यांची निवड करण्यात आली आहे. पठाण बिरादरीच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या सभेत हा निर्णय घेण्यात आला. हाजी शरीफखान पठाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला सहाशेहून अधिक कार्यकर्ते, युवक व नागरिक



उपस्थित होते. शिक्षण, सामाजिक विकास आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही संघटना कार्य करणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी मोहसीनखान पठाण, उपाध्यक्षपदी अकबर पठाण व अमजदखान पठाण, सचिवपदी रफिक पठाण, सहसचिवपदी जुनेदखान पठाण व फिरोजखान पठाण, तर खजिनदारपदी फिरोज हसन पठाण यांची निवड करण्यात आली. विविध सेल्ससाठीही पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संघटनेच्या माध्यमातून राज्यभरातील पठाण बिरादरीचे संघटन करून शैक्षणिक व सामाजिक प्रगतीला चालना दिली जाणार असल्याचे अध्यक्ष सलीमखान पठाण यांनी सांगितले. लवकरच तालुका व जिल्हास्तरीय कार्यकारिणी स्थापन करण्यात येणार असून इच्छुकांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अवजड वाहनांमुळे बेलापूर-वळदगाव रस्त्याची दुरावस्था

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर बु. ते वळदगाव या मार्गाची अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे दुरावस्था झाली असून संपूर्ण रस्ता खड्डेमय बनला आहे. खाणीतील बेकायदा वाहतुकीसाठी २० ते ४० टन क्षमतेची मुरूम, खडी व दगड वाहून नेणारी वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने रस्त्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

सदर रस्ता दोन वर्षांपूर्वीच डांबरीकरण करण्यात आला होता. मात्र सततच्या अवजड वाहतुकीमुळे रस्ता उखडून गेला असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या मार्गावरून शेतकरी, विद्यार्थी व ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. खड्ड्यांमुळे किरकोळ अपघात वारंवार होत असून काही गंभीर दुर्घटनाही घडल्या आहेत. वळदगाव परिसरात दुचाकीस्वार घसरून जखमी होऊन उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आरटीओ, पोलीस व महसूल प्रशासनाने तत्काळ कारवाई करून बेकायदा अवजड वाहतूक बंद करावी, तसेच रस्त्याच्या नुकसानीची भरपाई संबंधितांकडून वसूल करावी, अशी मागणी केली आहे. वळदगावचे सरपंच भोसले यांच्याकडेही तक्रारी करण्यात आल्या असून शाळकरी मुलांना या परिस्थितीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.



## नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि .१६ एप्रिल २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|
| १८० २७० ९०० | ९-१ | १४६ १२८ ११९ |
| जोड | | ३१-२४-५७ १८-९० |

### कल्याण

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|
| १९० १४५ ११८ | ०-६ | १२३ १५० ११४ |
| जोड | | ०३-२६-४५ १९-६७ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|
| २६० ३५० ११६ | ८-९ | १२६ १८० ११७ |
| जोड | | ८१-५९-७४ २०-९६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# सिस-पे समर्थ क्रॉप घोटाळा
# गुंतवणूकदारांचे कोट्यवधी बुडाले

दादा सोनवने । राष्ट्र सह्याद्री




**नागरिक पुन्हा सावकारांच्या दारात**

**श्रीगोंदा :** जास्त परताव्याच्या गोड आमिषाला भुलून तालुक्यातील शेकडो नागरिकांनी 'सिस-पे आणि समर्थ क्रॉप' कंपनीच्या योजनेत केलेली गुंतवणूक आता जवळपास पूर्णपणे बुडाल्याचे स्पष्ट झाले असून, हातचे गेले आणि उरले सुरलेही जाण्याची वेळ गुंतवणूकदारांवर आली आहे. आर्थिक कोंडीत सापडलेल्या नागरिकांना आता पुन्हा एकदा खाजगी सावकारांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

प्रत्येकाला वाटते दोन पैसे वाढतील या आशेने केलेली गुंतवणूक आज डोकेदुखी ठरली आहे. तालुक्यातील नागरिकांनी 'सिस-पे आणि समर्थ क्रॉप' कंपनीच्या योजनेत केलेली गुंतवणूक आता जवळपास पूर्णपणे बुडाल्याचे स्पष्ट झाले यामध्ये

विशेष म्हणजे, काही पोलीस ,वकील,पत्रकार यासह सावकारांचीदेखील या प्रकरणात फसवणूक झाल्याने त्यांनीही हात झटकले आहेत. परिणामी, कर्जासाठी गेलेल्या गरजूंची अवस्था आले होते तारणासाठी, परतले उधारीसाठी अशी झाली आहे. दरम्यान, या घोटाळ्याविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न नागरिकांकडून होत असला, तरी प्रकरण न्यायालयीन गुंतागुंतीत अडकलेले आहे. आश्चर्याची बाब म्हणजे काही पोलीस आणि विधिज्ञांनीदेखील या योजनेत गुंतवणूक केल्याची चर्चा असून, त्यामुळे कायदेशीर लढाईतही अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे.दुसरीकडे, संकटसमयी आधार देतील अशी अपेक्षा असलेल्या पतसंस्था व मल्टिस्टेट पतपेढ्यांनीही कोट्यवधी रुपयांचा गैरकारभार केल्याच्या आरोपांनी नागरिकांचा विश्वास डळमळीत झाला आहे. याच पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयासमोर गैरव्यवहाराविरोधात आमरण उपोषण सुरू असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.एकंदरीत, ना घरचा ना घाटचा अशी परिस्थिती निर्माण झाली असून, गरजवंत नागरिक अक्षरशः दाही दिशा भटकत आहेत. आता प्रशासनाने ठोस भूमिका घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी आणि पीडितांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

**आर्थिक गुन्हे शाखेत तक्रारीचा पाऊस**

नागरिकांनी 'सिस-पे आणि समर्थ क्रॉप' कंपनीच्या योजनेत केलेली गुंतवणूक आता जवळपास पूर्णपणे बुडाल्याचे स्पष्ट झाले त्यामुळे याबाबत आर्थिक गुन्हे शाखेच्या कार्यालयात तक्रारी वाढतच चालल्या आहेत मात्र अद्यापही कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई झाली नसल्याने ती ठोस कारवाई कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

**एजंट आणि गुंतवणूकदार यांच्यात वाद?**

नागरिकांनी 'सिस-पे आणि समर्थ क्रॉप' कंपनीच्या योजनेत गुंतवणूक करताना एजंट यांनी मोठी आस्वासने दाखवून टार्गेट पूर्ण केले मात्र आता कंपनी गायब झाल्यामुळे एजंटला गुंतवणूकदार पैशे मागत असल्याने दोघामधील वाद जास्त होत असल्याचे चित्र तालुक्यात पाहण्यास मिळत आहे

## दखल

### शिक्षणानेच समाजाचा सर्वांगीण विकास शक्य: अभियंता जाधव



माही जळगाव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र दिला. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते प्राशन करणारा माणूस अन्यायाविरुद्ध गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे भावी पिढीच्या प्रगतीसाठी आणि सक्षम समाजाच्या निर्मितीसाठी शिक्षण हेच सर्वात प्रभावी शस्त्र आहे, असे प्रतिपादन शाखा अभियंता जाधव यांनी केले.माही जळगाव येथील सीना कॉलनीम ध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी अभियंता जाधव यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विचार मंच प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास सेवाभावी संस्थेचे साळवे, पातुर सोनवणे, तोरणमल भैय्या, काळंगे, योगेश जाधव, बामणे भैय्या आणि पाटेगावचे महानवर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांवर प्रकाश टाकला. सीना कॉलनी परिसरातील नागरिक आणि तरुण मोठ्या संख्येने या उत्सवात सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे नियोजन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

### माही जळगाव ग्रामपंचायतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



माही जळगाव : जळगाव ग्रामपंचायत येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे श्री भगवानराव साळवे सर यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी सांगितले की, बाबासाहेबांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या मंत्राचे पालन करून तरुण पिढीने व्यसनमुक्त व्हावे आणि शिक्षणावर भर द्यावा. याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विचारमंच प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ शिंदे, माजी सरपंच रावसाहेब शेटे, भानुदास साखरे, माजी उपसरपंच संतोष घोडके, ग्रामसेवक किरण जवणे, कर्मचारी आप्पा लाड, किशोर शेटे तसेच अंगणवाडी सेविका व आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचा समारोप करताना ग्रामसेवक किरण जवणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सर्वांनी बाबासाहेबांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प यावेळी केला.

### माही जळगाव चौफुला येथे डॉ. आंबेडकर जयंती साजरी



माही जळगाव : माही जळगाव चौफुला येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अशोकराव खेडकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. आपल्या मनोगतात खेडकर म्हणाले की, शिक्षण हे वाघिणीचे दूध असून, बाबासाहेबांच्या 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' या मंत्रामुळेच समाजात जागृती निर्माण झाली आहे. तरुण पिढीने व्यसनांपासून दूर राहून बाबासाहेबांचे विचार आचरणात आणावेत. तसेच कुमारी प्रांजल आनंद साळवे हिने आपल्या भाषणातून तरुणांना प्रबोधन केले.याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विचार मंचचे नवनाथ शिंदे, प्रा. भीमराव तोरडमल, भीमराव साळवे, ॲड. आनंद साळवे, डॉ. शिवाजी शिंदे, बापूराव शिंदे, अमोल बामणे, दादा दादर, भानुदास दादर, रमेश साबळे, वैभव साबळे, महेश पाटील, हनुमंत शिंदे, निलेश जाधव, विष्णू खेडकर, मनोज साबळे, अनुप पवार, राजेंद्र साळवे, संदीप सोनवणे यांच्यासह विकी, रवी, राम व अतुल साबळे आदी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साई सेवा पतसंस्थेच्या ठेवीदारांचा एल्गार

■ हक्काच्या पैशांसाठी तहसीलसमोर उपोषण सुरू ■ श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील प्रकरण

**'बचाव कृती समिती' आक्रमक, प्रशासनाला १० मागण्यांचे निवेदन**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील 'साई सेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थे'मधील आर्थिक गैरव्यवहार प्रकरण आता अधिकच तापले आहे. संस्थेने ठेवी परत न केल्याने संतप्त झालेल्या ठेवीदारांनी 'साई सेवा बचाव कृती समिती'च्या माध्यमातून बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ पासून श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. आमचे पैसे आम्हाला मिळालेच पाहिजेत, अशा घोषणांनी तहसील परिसर दणाणून गेला होता.

सामान्य नागरिकांनी, कष्टकऱ्यांनी आपल्या आयुष्यभराची पुंजी या पतसंस्थेत विश्वासाने ठेवली होती. मात्र, गेल्या काही काळापासून ठेवी परत मिळत नसल्याने ठेवीदारांमध्ये तीव्र असंतोष आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलकांनी प्रशासनासमोर १० प्रमुख मागण्यांचे निवेदन सादर केले आहे.या आंदोलनाचे नेतृत्व समन्वयक सारंग पाचपुते, आशा ताटे आणि शिवाजी खोमणे करत आहेत. हा केवळ पैशांचा विषय नसून लोकांच्या जगण्याचा प्रश्न आहे. जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत माघार घेणार नाही, असा पवित्रा समितीने घेतला आहे.

या उपोषणामुळे संपूर्ण श्रीगोंदा तालुक्यात खळबळ उडाली असून, प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला आहे. आता प्रशासन ठेवीदारांना न्याय देण्यासाठी काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**प्रमुख मागण्या:**

* सर्व ठेवीदारांना मूळ रक्कम व्याजासह तात्काळ मिळावी.
* अध्यक्ष, संचालक व व्यवस्थापकांवर चझखू कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून अटक व्हावी.
* या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात यावा.
* दोषींची मालमत्ता जप्त करून लिलावाद्वारे ठेवीदारांची देणी भागवावीत.
* पतसंस्थेचे फॉरेन्सिक ऑडिट करून मोठा कर्जदारांची यादी जाहीर करावी व सक्तीची वसुली व्हावी.



# साई सेवा पतसंस्थेच्या संचालकांवर कारवाई करा

ठेवीदारांचा प्रशासनाला 'अल्टिमेटम' : ३० कोटींची वसुली प्रलंबित असल्याने संताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** काष्टी येथील साई सेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेतील आर्थिक गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर ठेवीदारांचा संताप अनावर झाला आहे. ठेवीदारांच्या विशेष बैठकीत प्रशासनाला कडक इशारा देण्यात आला असून, संचालक मंडळ आणि दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी बोलताना प्रीतम पाचपुते यांनी संचालकांना तात्काळ नोटीस बजावून वसुली सुरू करण्याची मागणी केली. चेअरमन आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निष्क्रिय असून लोकांचे लग्न, शिक्षण आणि आजारपणासाठी ठेवलेले पैसे अडकले आहेत. प्रशासनाने एक महिन्यात सविस्तर अहवाल सादर करावा, असा अल्टिमेटम त्यांनी दिला. आशा ताटे यांनी सुमारे १७ हजार ठेवीदार अडचणीत असल्याचे सांगत सहाय्यक निबंधकांनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली. निबंधक नारायण परजणे यांनी संस्थेच्या व्यवस्थापनावर ताशेरे ओढत सांगितले की, वेळेत लेखापरीक्षण न झाल्यामुळे ही परिस्थिती ओढवली आहे. कर्ज तपासणीअंती गुन्हे दाखल होऊन संचालकांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई होऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. संस्थेची सुमारे ३० कोटी रुपयांची वसुली प्रलंबित असून, ठेवीदारांनी आता सहकार आयुक्तांकडे धाव घेत प्रशासक नेमणुकीची मागणी केली आहे. न्याय न मिळाल्यास न्यायालयीन लढाई लढण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे विहीर व रस्ता बळकावला

**पीडित महिलेचे पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर :** बनावट कागदपत्रांच्या आधारे स्वतःच्या मालकीची विहीर आणि रस्ता बळकावल्याचा आरोप करत, देवसडे जेऊर (ता. नेवासा) येथील महिला शेतकरी संगीता परशुराम मिसाळ यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. गेल्या सात-आठ महिन्यांपासून न्यायासाठी पोलीस प्रशासनाचे उंबरठे झिजवूनही कारवाई होत नसल्याने त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले आहे.

मिसाळ यांचा आरोप आहे की, आरोपींनी जमिनीचे बनावट दस्त तयार करून विहीर व रस्त्यावर बेकायदेशीर ताबा मिळवला आहे. यामुळे पाणी असूनही शेती पडीक पडली असून कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याप्रकरणी नेवासा पोलीस आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना वारंवार निवेदने देऊनही, पोलीस उलट आरोपींनाच अभय देत असल्याची तक्रार त्यांनी केली आहे.

विशेष म्हणजे, नेवासा पोलीस वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करत असून, दाद मागणाऱ्या मिसाळ कुटुंबावरच खंडणीसारखे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.

आमच्या कागदपत्रांची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करावा, अन्यथा न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरूच राहील, असा इशारा संगीता मिसाळ यांनी दिला आहे. या आंदोलनामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



# अंतराळ विज्ञानाची भरारी..!

## 'समर्थ'च्या विद्यार्थ्यांना मिळाले 'नासा'चे बोर्डिंग पास

**'आंतरराष्ट्रीय मानव अंतराळ उड्डाण दिना'निमित्त विशेष उपक्रम; इस्रो आणि नासाच्या मोहिमांचे थेट दर्शन**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** येथील सावेडी परिसरातील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत 'आंतरराष्ट्रीय मानव अंतराळ उड्डाण दिवस' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे अमेरिकेच्या 'नासा' संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना प्राप्त झालेले बोर्डिंग पास आणि पासपोर्ट! यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अंतराळ संशोधनाविषयी प्रचंड कुतूहल निर्माण झाले आहे.

१२ एप्रिल १९६१ रोजी युरी गागारिन यांनी पहिल्यांदा पृथ्वी प्रदक्षिणा केली होती, त्या स्मृतीनिमित्त हा दिवस साजरा होतो. या औचित्याने स्पेस एज्युकेटर डॉ. अमोल बागुल यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. नासाच्या 'आर्टीमिस-२' या चांद्र मोहिमेचा १० दिवसांचा प्रवास आणि भारताच्या इस्रोच्या 'गगनयान' मोहिमेच्या चाचण्यांचे लाईव्ह प्रात्यक्षिक शेकडो विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अनुभवले.

याप्रसंगी संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर यांनी सांगितले की, मानवजातीच्या अंतराळ युगाचे स्म रण करणे आणि शांततापूर्ण हेतूंसाठी अवकाशाचा वापर करण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. प्राचार्या वसुधा जोशी यांनी प्रास्ताविक केले, तर शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे यांचेही या उपक्रमाला विशेष मार्गदर्शन लाभले.

**विद्यार्थ्यांची कल्पकता:**

विज्ञान शिक्षिका द्वारका खिलारी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सूर्यमालेची विविध स्वयंचलित शैक्षणिक साधने आणि प्रतिकृती तयार केल्या होत्या. अंतराळवीरांचे जीवन आणि तंत्रज्ञान यावर विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी मानले. या उपक्रमामुळे अहमदनगरमधील शालेय स्तरावर अंतराळ विज्ञानाप्रति एक नवी दिशा मिळाली आहे.

# संख्या नव्हे, विचारसरणी बदला...

लोकसभा सदस्यसंख्या वाढीच्या प्रस्तावास पीपल्स हेल्पलाईनचा तीव्र विरोध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** लोकसभेची सदस्यसंख्या ५४३ वरून ८५० करण्याच्या केंद्र सरकारच्या प्रस्तावावर पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद या संघटनांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. केवळ सदस्यसंख्या वाढवल्याने लोकशाहीचे प्रश्न सुटणार नाहीत, उलट यामुळे शासन व्यवस्थेत गोंधळ, असमतोल आणि अनागोंदी वाढण्याची शक्यता असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी या निर्णयावर भाष्य करताना सांगितले की, सध्याच्या संसदेत पक्षीय संघर्षामुळे लोकहिताचे प्रश्न दुय्यम ठरत आहेत. 'एकात्मिक ज्ञान सिद्धांता'नुसार, जोपर्यंत लोकप्रतिनिधींची विचारसरणी स्वार्थी आणि सत्ताकेंद्रित राहील, तोपर्यंत सदस्यसंख्या कितीही वाढवली तरी अराजकताच निर्माण होईल. जनगणनेशिवाय केलेले परिसीमन संघराज्यीय समतोलासाठी घातक ठरेल, असा दावाही त्यांनी केला. संस्थेच्या वतीने 'रिकॉन्शिओ गव्हर्नन्स' हा पर्याय म ांडण्यात आला असून, यामध्ये लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती या त्रिसूत्रीवर भर दिला आहे. संख्या वाढवून संसद सुधारत नाही, तर विचार बदलल्याशिवाय शासन बदलत नाही, अशी भूमिका मांडत देशभरात 'जनलोक मानसशास्त्र क्रांती' राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# रामदास तांबे यांच्या 'पत्रावळ' लघुचित्रपटाचा गौरव

## सांस्कृतिक कलादर्पण महोत्सवात पटकावला मानाचा पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील मॉडेल व्हिलेज गोरेगावचे सुपुत्र, लेखक-दिग्दर्शक रामदास महादेव तांबे यांच्या 'पत्रावळ' या लघुचित्रपटाने सांस्कृतिक क्षेत्रात तालुक्याचा डंका वाजवला आहे. चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठान प्रस्तुत 'सांस्कृतिक कलादर्पण लघुचित्रपट महोत्सव २०२६' मध्ये या चित्रपटाला 'लक्षवेधी लघुचित्रपट' हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सुप्रसिद्ध अभिनेते अरुण नलावडे, ज्येष्ठ अभिनेते जयंत ओक आणि अभिनेते सुचित जाधव यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ग्रामीण वास्तव, सामाजिक जाणिवा आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा सुरेख संगम या लघुपटात पाहायला मि ळतो. एका निसर्गप्रेमी व्यक्तीच्या संघर्षाची ही कथा केवळ उदरनिर्वाहाची नसून, प्लास्टिक युगात पारंपरिक पत्रावळींचे महत्त्व सांगणारी आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारी आहे.

या लघुपटात डॉ. सुरेश शिंदे यांनी मुख्य भूमिका साकारली असून डॉ. वर्षा बांडे, राहुल बरडे यांच्या सहाय्यक भूमिका आहेत. किरण गावडे, अमेय गावडे, सोमेश थोरात आणि वैष्णवी तांबे यांनी तांत्रिक बाजू सांभाळली आहे.

या यशाबद्दल संपूर्ण पारनेर तालुक्यातून रामदास तांबे आणि त्यांच्या टीमवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**पुरस्कार हा तालुक्याचा अभिमान**

रामदास तांबे यांचे हे यश संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानास्पद आहे. ग्रामीण भागातील तरुणाने कलेच्या जोरावर राज्यस्तरावरील व्यासपीठावर मोहोर उमटवणे ही प्रेरणादायी बाब आहे. 'पत्रावळ'मधून सामाजिक जाणिवा जागृत करण्याचे काम त्यांनी केले आहे. अशा दर्जेदार कलाकृती साकारणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे. रामदास यांना पुढील वाटचालीस माझ्या शुभेच्छा!

आ. काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)



द•ख•ल

## पुरंदरात २० एप्रिलला 'लोकशाही दिन' आयोजन

**नाझरे सुपे, सासवड :** पुरंदर तालुक्यातील नागरिकांच्या विविध तक्रारींचे थेट निवारण करण्यासाठी 'लोकशाही दिन' कार्यक्रम सोमवार, दि. २० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता तहसीलदार कार्यालय, सासवड येथे आयोजित करण्यात आला आहे.
महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुका स्तरावर हा उपक्रम राबवला जातो. नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडवणे व प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणे हा यामागील उद्देश आहे. या कार्यक्रमात पंचायत समिती, कृषी विभाग, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन, जलसंपदा विभाग आदी शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे विविध विभागांशी संबंधित तक्रारी एकाच ठिकाणी मांडण्याची सुविधा नागरिकांना मिळणार आहे. नागरिकांनी आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह सादर कराव्यात, असे आवाहन तहसीलदार कार्यालयाने केले आहे. कार्यक्रम तहसीलदार कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत होणार असून, तक्रारींचे तातडीने निवारण करण्यासाठी संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

## दुचाकीचालकाला मारहाण करत जबरदस्तीने उकळले पैसे

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथे कार चालकाला दुचाकीचा धक्का लागल्याने दुचाकी चालकाला मारहाण करत जबरदस्तीने ऑनलाईन पैसे घेतल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे ऋतिक संभाजी थिटे या कार चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पुणे नगर महामार्गावरून कल्पेश आहिरे व राहुल मोरे हे त्यांच्या ताब्यातील दुचाकीहून चाललेले असताना अचानकपणे आलेली कार वळण घेत असताना सदर कारचा धक्का कल्पेश यांच्या दुचाकीला लागल्याने कार चालकाने कल्पेश व राहुल या दोघांना शिवीगाळ, दमदाटी करुन हाताने मारहाण करत माझ्या गाडीची नुकसान भरपाई द्या असे म्हणून मारहाण करण्याची धमकी देत जबरदस्तीने ऑनलाईन चार हजार रुपये घेतले, याबाबत कल्पेश सुनील आहिरे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी ऋतिक संभाजी थिटे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार उद्धव भालेराव हे करत आहे.

## शिक्रापूर येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरु करा

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) व परिसरात वाढत्या नागरिकीकरण व औद्योगिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली असून सध्या शिक्रापूर ते शिरूर हे अंतर सुमारे पस्तीस किलोमीटर असल्याने नागरिकांना शासकीय कामांसाठी मोठा वेळ व खर्च करावा लागत आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) व परिसरासह कोरेगाव भीमा, तळेगाव ढमढेरे व पाबळ मंडल अधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील अनेक गावांतील नागरिकांना तहसील कार्यालयीन कामांसाठी शिरूर येथे जावे लागत असून सातबारा दुरुस्ती, परवानगीची प्रकरणे, विविध दाखले मिळवणे अशा कामांसाठी दिवसाचा मोठा वेळ खर्च होत असल्यामुळे शेतकरी, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, शिक्रापूर येथे पुणे महानगर विकास प्राधिकरणचे कार्यालय सुरू झाले असून भूमी अभिलेख विभागाचे कार्यालय देखील कार्यरत असल्याने शासकीय यंत्रणेची पायाभूत सुविधा येथे उपलब्ध झाली आहे. परिसरात शाळा व महाविद्यालयांची संख्या मोठी असल्याने विद्यार्थ्यांना दाखल्याची सुविधा स्थानिक पातळीवर मिळणे आवश्यक असून परिसरातील औद्योगिक वसाहत मधील नागरिकांना शिरुरला जावे लागत असल्याने सदर सर्व बाबींचा विचार करता प्रशासनाने शिक्रापूर येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू केल्यास परिसरातील हजारो नागरिकांचा वेळ वाचणार असून शासकीय कामकाज अधिक सुलभ होण्यास मदत होणार असल्याने शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहे.

# पुणे जिल्ह्यात ३८६१ रुग्णांना सुमारे ३४.५३ कोटींची मदत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. पुणे जिल्ह्यात आर्थिक वर्षात ३,८६१ रुग्णांना सुमारे ३४ कोटी ५३ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत :**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी आर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत :**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत पुणे जिल्ह्यातील ३,८६१ रुग्णांना सुमारे ३४ कोटी ५३ लाख ९९ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

**संपर्क साधण्याचे आवाहन :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दुरदृष्टीतून साकरण्यात आलेल्या जिल्हा कक्ष, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, सामंजस्य करार आदींमुळे रूग्णांना वेळेत अर्थसाहाय्य होत आहे. गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता आणि अधिक माहितीकरिता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांना केले आहे.

## बारामतीत वंजारवाडी जवळ सोमनाथ हॉटेलचे अमृता लॉजवर मध्यरात्री छापा..!



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती–भिगवण रोडवरील अमृता लॉज (सोमनाथ हॉटेल) येथे सुरू असलेल्या अवैध वेश्या व्यवसायावर बारामती तालुका पोलिसांनी मध्यरात्री टाकलेल्या छाप्यात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून पाच महिलांची सुटका करण्यात आली आहे.

१४ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ३ च्या वाजण्याच्या सुमारास पोलिसांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, उपनिरीक्षक राम हरी भोसले यांच्या पथकाने बोगस ग्राहकाच्या मदतीने सापळा रचला. पंचांना सोबत घेऊन नियोजनपूर्वक अमृता लॉजवर धाड टाकण्यात आली. छाप्यादरम्यान लॉजमधील विविध खोल्यांची तपासणी करण्यात आली असता काही ठिकाणी महिला व ग्राहक एकत्र आढळून आले. चौकशीदरम्यान संबंधित आरोपी हे बाहेरून महिलांना आणून त्यांना ग्राहकांना पुरवत असल्याचे उघड झाले. ग्राहकांकडून पैशांची वसुली करून त्यातून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेत असल्याचेही समोर आले. या प्रकरणात अजित जयसीन शेट्टी (वय ३८, हॉटेल चालक) व चाँद कलाम आलम (वय २०) यांना अटक करण्यात आली आहे.
या घटनेत सापडलेल्या पश्चिम बंगाल येथील ०३, भिवंडी मुंबई येथील ०२ अशा ०५ महिलांची सुटका करण्यात आली. त्यांना सुधारगृहात ठेवण्यात आले. आरोपी दोघांनी संगनमत करून महिलांना पैशांचे आमिष दाखवत देहव्यवसाय चालविल्याचे निष्पन्न झाले आहे. कारवाई दरम्यान पोलिसांनी बोगस ग्राहकाला दिलेल्या नोटांसह रोख रक्कम, मोबाईल फोन, कंडोम पाकिटे तसेच ग्राहकांची नोंद असलेले रजिस्टर असा सुमारे १७,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात भा. न्याय संहिता कलम १४३(३), ३(५) तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा १९५६ च्या कलम ४ व ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव पोलीस उपनिरीक्षक रामहरि भोसले पोलीस अंमलदार संतोष कांबळे केदारनाथ बिडवे नितीन ढवाण राजू बनणे निलेश वाकळे विठ्ठल तरंगे स्मिता गायकवाड यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## उन्हाळी बाजरीची चार हजार हे. वर पेरणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पावसाळ्यात जास्त पाऊस असल्यामुळे रोग, किडीमुळे उत्पादन घट येते. उन्हाळी हंगामात रोग, किडीचा प्रादुर्भाव फारसा होत नाही. त्यामुळे अनेक शेतकरी उन्हाळी हंगामातील बाजरीची पेरणी करतात. यंदा खेड, जुन्नर तालुक्यात मोठ्या प्रमाणात पेरणी झाली आहे.**
**संजय काचोळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, पुणे**

**पुणे :** जिल्ह्यात सुमारे ४,०१४ हेक्टर क्षेत्रावर बाजरीची पेरणी झाली असून हे क्षेत्र सरासरी ४,६२८ हेक्टरच्या जवळपास आहे. गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही मोठ्या क्षेत्रावर पेरणी झाली आहे. उन्हाळी हंगामात रोग व किडींचा प्रादुर्भाव तुलनेने कमी असल्याने शेतकरी पावसाळी हंगामाऐवजी उन्हाळ्यात बाजरी घेण्याकडे वळत आहेत. पुणे जिल्ह्यात यंदा शेतकऱ्यांनी उन्हाळी बाजरी पिकावर मोठ्या प्रमाणात भर दिला असून सध्या अनेक ठिकाणी पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. त्यामुळे येत्या हंगामात चांगल्या उत्पादनाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेषतः खेड तालुक्यातील शेतकऱ्यांना भरघोस उत्पादन मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पावसाळ्यातील जास्त पावसामुळे बाजरीवर रोग–किडींचा प्रादुर्भाव वाढतो आणि उत्पादनात घट होते. याउलट उन्हाळ्यात कमी प्रादुर्भाव, स्थिर उत्पादन आणि चांगल्या दर्जाचा चारा उपलब्ध होत असल्याने या पिकाची लोकप्रियता वाढत आहे. त्यामुळे आंबेगाव, खेड, शिरूर आणि जुन्नर तालुक्यांतील शेतकरी मोठ्या प्रमाणावर बाजरीची लागवड करत आहेत. खेड तालुक्यातील वाफगाव, कळूस, दावडी, गुंडाळवाडी, बुरसेवाडी, सोयगाव आणि वेताळे या गावांत सर्वाधिक पेरणी झाली आहे. तर जुन्नर तालुक्यात नारायणगाव, खोडद, बेल्हे, आळेफाटा, ओतूर आदी गावांतही मोठ्या प्रमाणावर बाजरीची लागवड करण्यात आली आहे. आंबेगाव तालुक्यात निरगुडसर, नागापूर, अवसरी, मंचर आणि पेठ परिसरातही पेरणीचा मोठा प्रतिसाद दिसून आला.

## पोंदेवाडीत रस्त्यावर विद्युत तारांचा धोका वाढला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** पोंदेवाडी (ता. आंबेगाव) येथील गावालगतच्या रस्त्यावर विद्युत तारा लोंबकळत असल्याने गंभीर धोका निर्माण झाला आहे. संबंधित विभागाने तातडीने याकडे लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पोंदेवाडीचे माजी उपसरपंच संदीप पोखरकर, आनंदा पोंदे, चंद्रकांत विरकर यांनी केली आहे पोंदेवाडी ते काठापूर या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटी करणाचे काम सुरू असल्याने रस्त्याची उंची वाढली आहे. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या विद्युत वाहक तारा आता अत्यंत कमी उंचीवर, जवळजवळ हाताच्या अंतरावर लोंबकळत आहेत. यामुळे या मार्गाने ये–जा करणाऱ्या प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या धोकादायक परिस्थितीकडे महावितरण ने दुर्लक्ष न करता तात्काळ विद्युत तारा उंचावण्याचे व सुरक्षिततेचे काम पूर्ण करावे, अशी मागणी पोंदेवाडी ग्रामस्थांनी केली आहे. अष्टविनायक रस्ता तसेच पारगाव कारखाना रस्ता जवळ असल्याने या



मार्गावरून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनेही ये–जा करतात. त्यामुळे या वाहनांचा विद्युत तारांना स्पर्श होऊन अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच ट्रॅक्टर किंवा बैलगाडीतून वैरण नेताना देखील तारांना स्पर्श होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय, जोरदार वाऱ्यामुळे विद्युत तारा हलत राहतात, त्यामुळे त्या तुटून मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर शेतकरी व ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

# भराडी येथे दीड वर्षांची बिबट मादी जेरबंद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** आंबेगाव तालुक्यातील भराडी येथील वखारवाडीत वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात दीड वर्षांची बिबट मादी मंगळवार (ता.१४) रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास जेरबंद झाली. या वस्तीवर गेल्या तीन ते चार महिन्यांपासून बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून वनविभागाने आतापर्यंत चार बिबटे जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. भराडीतील वखारवाडीत तीन महिन्यांपूर्वी एक बिबट्या विहिरीत पडला होता. त्यावेळी वनविभागाने त्याचे यशस्वी रेस्क्यू केले होते. त्यानंतर बिबट्यांची दहशत वाढल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून या ठिकाणी पिंजरा लावण्यात आला. दोन महिन्यांपूर्वी याच पिंजऱ्यात दोन बिबटे जेरबंद झाले होते. मंगळवारी सकाळी पिंजऱ्याचा खटका लागल्याचा मोठा आवाज झाल्याने जवळच काम करणारे शेतकरी घटनास्थळी धावले. त्यांनी पिंजऱ्यात बिबट मादी अडकलेली पाहिली. पोलिस पाटील संतोष खिलारी यांनी याची माहिती वनविभागाला दिल्यानंतर अधिकारी, कर्मचारी आणि रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. बिबट मादीला ताब्यात घेऊन पुढील काळजीसाठी माणिकडोह येथील निवारा केंद्रात रवाना करण्यात आले.

**परिसरात भीतीचे वातावरण**

**भराडी येथील चौफुला जवळील थोरात वस्ती परिसरात बिबट्याचे दिवसा देखील वारंवार दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी दुपारी एक युवक शेतावर जात असताना अचानक बिबट्याने डरकाळी फोडल्याने तो घाबरून पडला. या अपघातात त्याच्या हाताला फ्रॅक्चर झाले असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**

## मुलगी दत्तक देणे घेणे दोन दांपत्यांच्या आले अंगलट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** तर्डोबाची वाडी (ता. शिरुर) येथील एका दांपत्याने त्यांची नवजात मुलगी एका दांपत्याला दत्तक दिली. मात्र अधिकृत दत्तक प्रक्रिया पाळली न गेल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे सोमनाथ अर्जुन पोटावळे, यशोदा अर्जुन पोटावळे, बालाजी आण्णासाहेब जाधव व सुलभा बालाजी जाधव या दोघा दांपत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
तर्डोबाची वाडी (ता. शिरुर) येथील सोमनाथ पोटावळे व यशोदा पोटावळे या दांपत्याने जानेवारी २०२३ मध्ये त्यांची नवजात मुलगी बालाजी जाधव व सुलभा जाधव यांना दत्तक दिली होती, मात्र सदर दांपत्याने अधिकृत दत्तक प्रक्रिया पार पाडली नसल्याबाबतची तक्रार प्रशांत थोरात यांनी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय पुणे येथे केली होती, त्यांनतर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाचे बाल संरक्षण अधिकारी शत्रुघ्न खोकले यांनी तर्डोबाची वाडी येथे जात चौकशी केली असता आम्हाला नोव्हेंबर २०२२ मध्ये झालेली मुलगी आम्ही जानेवारी २०२३ मध्ये दुय्यम निबंधक कार्यालय शिरुर येथे दत्तकपत्र करुन बालाजी जाधव व सुलभा जाधव या दांपत्याला दिल्याचे सोमनाथ पोटावळे व यशोदा पोटावळे यांनी सांगितले,

# आळंदीतील प्रभाग ३ मध्ये नवीन पथदिव्यांचे लोकार्पण

**आळंदी :** आळंदी नगरपरिषदेच्या वतीने प्रभाग क्रमांक ३ मधील के.के.हॉस्पिटल शेजारील बाह्यवळण रस्त्यावर नव्याने बसविण्यात आलेल्या विद्युत पथदिवे व पोलचे लोकार्पण करण्यात आले. मुख्याधिकारी माधव खांडेकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, स्थानिक नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे व नगरसेविका पूजा संजय घुंडरे यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी नगरसेवक रामभाऊ भोसले, आदित्य घुंडरे, गोविंद कुऱ्हाडे, दिनेश घुले, सचिन गिलबिले, सुरेश झोबांडे, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, उज्वला काळे यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर रस्त्यावर पूर्वी मधोमध उभारलेले विद्युत पोल वाहतुकीस अडथळा ठरत होते. वाढत्या रहदारीमुळे अपघाताचा धोका निर्माण झाल्याने हे पोल काढण्यात आले होते. परिणामी काही काळ परिसर अंधारात गेला होता. दरम्यान, नागरिकांच्या मागणीनुसार नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे व नगरसेविका पूजा संजय घुंडरे यांनी नवीन पथदिवे



बसविण्याची मागणी नगरपरिषदे कडे केली होती. त्यानुसार काम हाती घेऊन ११ एप्रिलपर्यंत ते पूर्णत्वास आले. यावेळी बोलताना नगरसेविका पूजा घुंडरे यांनी सांगितले की, धोकादायक ठरत असलेले जुने पोल काढून सुरक्षित ठिकाणी नवीन पथदिवे बसविल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असून, पुढील काळातही प्रभागातील मूलभूत सुविधांवर भर देण्यात येणार आहे. माऊली पार्क परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आश्वासनही लवकर पूर्ण करावे, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.


## ग्रामपंचायत श्रीक्षेत्र महाळुंगे (इं.)

मु.पो. श्रीक्षेत्र महाळुंगे (इं), ता. खेड, जि.पुणे ४१०५०१.

ग्रामपंचायत महाळुंगे ता. खेड जि. पुणे यांचेकडील महाराष्ट्र शासन सार्वजनिक यांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी कृत ठेकेदार यांचेकडुन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या सीलबंद निविदा ठेकेदाराकडुन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहे. निविदा नमुना ग्रा. पं. महाळुंगे ता. खेड जि. पुणे यांचेकडुन दिनांक १६/०४/२०२६ ते २४/०४/२०२६ दुपारी २.०० वा. पर्यंत देण्यात येतील व भरुन पाठवलेली मोहरवंद निविदा १०.०० ते ५.०० वा. पर्यत स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | कार्यवाही अवधी | निधी स्तर | इसारा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदिर मागील मोकळ्या जागेत पत्राशेड तयार करणे. | ६५८५१९/- | ७ दिवस | १५ वा वित्तआयोग | ६५८५/- | ५००/- |
| २ | जेष्ठ नागरीक संघ कार्यालय परिसर सुधारणा करणे | ३८१९४८/- | ७ दिवस | ग्रामनिधी १५ वा वित्त आयोग | ३८१९/- | ५००/- |

**सुचना** १) कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकारी ग्रा.पं ने राखुन ठेवले आहे. २) कोणतीही निविदा कारण न देता रद्द अथवा फेरबद्दल करण्याचा अधिकार ग्रा. पं. ने राखुन ठेवला आहे. ३) सदर निविदा बंद लिफाफ्यामध्ये आवश्यक आहे ४) सोबत खालील पुढील कागदपत्रे आवश्यक आहे -१) रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट ३) पॅन कार्ड ३) G.S.T रजिस्ट्रेशन

**श्री. बापु बबन गोरे** — **ग्रामपंचायत अधिकारी**
**सौ.अर्चना मुकुंद महाळुंगकर** — **प्रशासक**
**ग्रामपंचायत महाळुंगे इंगळे, ता. खेड, जि. पुणे. करिता.**


## उन्हाळी सिंचनासाठी ७० दिवसांचे आवर्तन सुरू

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील शेतीसाठी दिलासा देणारी बातमी समोर आली असून खडकवासला प्रकल्पातून उन्हाळी सिंचनासाठीचे आवर्तन १८ फेब्रुवारीपासून सुरू झाले आहे. हे आवर्तन अंदाजे ७० दिवस चालणार असून या कालावधीत सुमारे ६ टीएमसी पाण्याचा वापर होणार असल्याची माहिती जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान, शहरातील पिण्याच्या पाण्याच्या वापरात कपात करण्याच्या सूचना राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत. मात्र, शेती सिंचनासाठी पाणी कपात करण्याबाबत कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे उन्हाळ्यातील पिकांसाठी पाण्याचा पुरवठा सुरळीत राहणार असल्याचे चित्र आहे. यापूर्वी ११ डिसेंबर २०२५ ते १० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ६४ दिवसांचे आवर्तन पार पडले होते. त्या वेळी एकूण ३.७७ टीएमसी पाण्याचा वापर करण्यात आला होता. त्यानंतर आता सुरू झालेले हे उन्हाळी आवर्तन दिलासा देणारे ठरणार आहे.उन्हाळी आवर्तन सुरू करण्यासाठी कालवा सल्लागार समितीची मंजुरी आवश्यक असते. या समितीचे अध्यक्ष म्हणून जलसंपदामंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्या विचारात घेतल्या. तसेच पाण्याअभावी शेतीचे नुकसान होऊ नये, यासाठी सकारात्मक भूमिका घेत या आवर्तनास मंजुरी दिली आहे. यामुळे पुणे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून उन्हाळी हंगामातील पिकांसाठी पाण्याची उपलब्धता होणार आहे.

## रुई गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**रुई (ता. बारामती) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रुई गावात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच गावात निळ्या झेंड्यांनी सजावट करण्यात आली होती. ठिकठिकाणी आकर्षक रोषणाई, स्वागत फलक व बॅनर्समुळे संपूर्ण गावात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. जयंतीनिमित्त रुई येथील बुद्ध विहार येथे त्रिशरण व पंचशील उच्चारत भगवान बुद्धांना वंदन करून पूजा–अर्चा करण्यात आली. बौद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर ग्रामस्थांनी मोठ्या श्रद्धेने बाबासाहेबांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून अभिवादन केले. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी बारामती नगर



परिषदेच्या नगरसेविका तथा उपगटनेते संपदा चौधर, प्रा. अजिनाथ चौधर, पत्रकार सुरज देवकाते, रत्नदीप कांबळे, प्रा. बापुराव खाडे, साईनाथ चौधर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांनी दिलेल्या शिक्षण, समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेल्या लढ्याची आठवण करून देत त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन करण्यात आले. कुमारी श्रेया पाटील तसेच आर्यन उमापे या चिमुकल्यांनी बाबासाहेबांबद्दल विचार व्यक्त केल्याबद्दल शुभम कांबळे तसेच पंचशील मित्र मंडळ यांच्यातर्फे बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन पंचशील तरुण मंडळ व रुई ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमास नगरसेवक विष्णुपंत चौधर, शिवाजी कांबळे, राजेंद्र कांबळे, शरद कांबळे, मच्छिंद्र चौधर, बाबासाहेब चौधर, मधुकर शिरसाट, दत्तात्रय चौधर, सुरज चौधर, मुख्याध्यापिका कांबळे मॅडम, शिक्षकवृंद, महिला भगिनी तसेच तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच रुई गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहपूर्ण, प्रेरणादायी व एकात्मतेच्या भावनेतून साजरी करण्यात आली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचे मूल्य आजही समाजाला दिशा देणारे आहे. सामाजिक न्याय आणि संविधानिक हक्कांची जपणूक करत प्रत्येक घटकापर्यंत विकास पोहोचवणे, हीच त्यांच्या विचारांची खरी अंमलबजावणी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या विचारांना कृतीत उतरवून समताधिष्ठित समाज घडविण्याचा संकल्प करावा. संपदा चौधर (नगरसेविका, बारामती)**


## ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि.पुणे

B१ पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२६/२७

ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-१ निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड जि.पुणे यांच्याकडुन दिनांक १६/०४/२०२६ ते दिनांक २३/०४/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक दिनांक १६/०४/२०२६ दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | दापोडी अंतर्गत बंदिस्त गटर योजना करणे. | २०००००/- | २३६/- | २०००/- |
| २ | दापोडी येथे कंपोस्ट खत खड्डा व पत्रा शेड उभारणे. | १८९५९६/- | २३६/- | १८९६/- |
| ३ | दापोडी गावठाण अंतर्गत बंदिस्त गटर योजना करणे. | २९९३३८/- | २३६/- | २९९३/- |
| ४ | नळ पाणीपुरवठा योजना परिसर सुधारणा करणे. | ४९९९९९/- | ५९०/- | ५०००/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत दापोडी PDCC बँक शाखा केडगाव खाते क्र.०२२००२५००००००१४ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत दापोडी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा केडगाव खाते क्र. ०२२००२५००००००१४ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.

सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत दापोडी यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी** — **सरपंच**
**ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड, जि. पुणे**

द•ख•ल

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने डॉ. आंबेडकरांना अभिवादन




**श्रीरामपूर** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक संतोष कांबळे, रोहिदास सेवा मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब कांबळे, शहराध्यक्ष संजय तुपे, डॉ.अफरोज तांबोळी, सचिन डोळस, विनोद चतुर्भुज, केंद्र प्रमुख बाबासाहेब पिलगर,उपाध्यक्ष नंदू तुपे, गटई कामगार अध्यक्ष सुरेश बोरुडे, राजेंद्र शेंडे, किरण बन्सी,सुरेश छल्ले, प्रशांत कांबळे,संतोष डहारे,भाऊसाहेब साळवे,राजेंद्र तुपे,राजेंद्र देशमुख,दिगंबर तुपे, सारंगधर म्हैसमाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## बोरावके नगरमध्ये श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी साजरी




**श्रीरामपूर** : शहरातील बोरावकेनगर येथील 'श्री स्वामी समर्थ सेवा आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र' येथे श्री स्वामी समर्थ महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या भक्तीभावात साजरी करण्यात आली. सकाळपासूनच केंद्रामध्ये स्वामी भक्तांची मांदियाळी पाहायला मिळाली. संपूर्ण परिसर 'श्री स्वामी समर्थ' जप आणि मंत्रोचाराने दुमदुमून गेला होता. आरती आणि नैवेद्य अर्पण करून महाराजांना अभिवादन करण्यात आले. केंद्रातील मुलांनी आणि महिला भाविकांनी स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे दर्शन घेऊन सामूहिक प्रार्थना केली. चैत्र वद्य त्रयोदशीला अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराजांनी आपली अवतारकार्य समाप्त केले होते. याच दिवसाचे औचित्य साधून दरवर्षी बोरावके नगरमधील या केंद्रात विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे या स्वामींच्या अभय वचनाचा जागर यावेळी करण्यात आला. यावेळी परिसरातील शेकडो स्वामी भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला असून, महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले होते.

## आव्हाणे बु येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**ढोरजळगांव** : शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बु येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सरपंच रामभाऊ वाघमारे, बबन भुसारी, अंबादास कळमकर , अंकुश आहेर, अंकुश कळमकर, कडूबाळ खरात ,सोमनाथ कळमकर , अशोकराव शिंदे, भरत मिसाळ ,दीपक वाघमारे ,विष्णू वाघमारे, बन्सी वाघमारे, भरत तिजोरी, अर्जुनराव सरपते, ईश्वर जगताप, सुभाष दिघे, संजय नांगरे, नवनाथ तागड, बाबासाहेब खरात, संतोष खरात ,सुनील पंडित, बाबुराव खरात, शिवाजी खरात, प्रताप भालेराव, रामदास दिवटे, पोपट वाघमोडे, पाराजी दिंडे ,भागिनाथ दिंडे ,गणेश डाके, निलेश डुरे, बाबासाहेब कोळगे,कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शशिकांत खरात यांनी तर आभार भरत मिसाळ यांनी मानले.

## चिचोंडीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**शिराळ चिचोंडी** : पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी बौद्ध विहारात पंचशील ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्रिशरण पंचशील ग्रहण केले ह्यावेळी चिचोंडी च उपसरपंच आबा गरुड सामाजिक कार्यकर्ते एकनाथराव आटकर ग्रामपंचायत सदस्य संदीप दानवे रमेश जराड सोमनाथ पालवे पिनू भिंगारदिवे विनोद भिंगारदिवे बाळू भिंगारदिवे संजय शिंदे आधी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी जय भीम नारी प्रतिष्ठानच वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

## सोनेवाडी ग्रामपंचायत कार्यालयात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**पोहेगांव** : कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी येथे ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. ग्रामपंचायत सदस्या मीनाताई खरात व भाऊसाहेब खरात यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपसरपंच संजय गुडघे, निरंजन गुडघे, ग्रामपंचायत सदस्य आबासाहेब जावळे ,चिलू जावळे, बबलू जावळे ,भाऊसाहेब खरे, पुंजाहरी आव्हाड आदी उपस्थित होते. निरंजन गुडघे यांनी सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज परिवर्तनासाठी मोठे काम केले आहे. शिका संघटित व्हा व संघर्ष करा हा मुलमंत्र त्यांनी दिला. तर सरपंच संजय गुडघे यांनी सांगितले की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करत असताना आपण त्यांच्या विचारांचे पाईक होणे गरजेचे आहे. भारत देशात नव्हे तर परदेशात देखील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना आदर्श मानतात म्हणूनच त्यांची जगभर जयंती साजरी केली जाते असे त्यांनी सांगितले. शेवटी आभार चिरुन जावळे यांनी मानले.

# लेझिमच्या ठेक्यावर भीम जयंतीचा जल्लोष

## विद्यार्थ्यांचे दमदार सादरीकरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ज्ञानदीप फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक लेझिम पथकाच्या माध्यमातून अनोखे अभिवादन करत परिसरात जल्लोषमय वातावरण निर्माण केले.



चिमुकल्या विद्यार्थ्यांनी भीम गीत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या गीतांवर लेझिमचे आकर्षक डाव सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्साही सादरीकरणाने वातावरण भारावून गेले होते. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन दिले. नगरसेवक बनसोडे म्हणाले की, डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान देशाच्या प्रगतीचे अधिष्ठान असून आजची पिढी त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेली लेझिम ही केवळ कला नसून बाबासाहेबांप्रती आदर व्यक्त करणारी भावना आहे. संस्थेचे अध्यक्ष पंकज लोखंडे यांनी सांगितले की, भीम जयंती हा सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा दिवस असून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

दरम्यान, ज्ञानदीप फाउंडेशन व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाच्या वतीने १७ ते १९ एप्रिलदरम्यान बोल्हेगाव येथे 'संविधान जागर अभियान' अंतर्गत भीम जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भीम गीतांचा कार्यक्रम व विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.

## ढोरजळगांव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**ढोरजळगांव** : भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती साजरी करण्यात आली. ज्ञान समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारलेला समाज घडवण्याचा त्यांचा विचार आजही आपल्याला मार्गदर्शक ठरत आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी कार्यरत राहण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

यावेळी बापुसाहेब पाटेकर, डॉ सुधाकर लांडे, राजेंद्र देशमुख, काकासाहेब पाटेकर ,महादेव पाटेकर,गणेश पाटेकर,देविदास गिर्हे , गणेश कराड, साईनाथ गरड,राजेंद्र गिर्हे,बाळासाहेब साबळे,नानासाहेब पाटेकर,जयकुमार देशमुख, बाळासाहेब पाटेकर,अरूण साबळे डॉ देविदास देशमुख,,संतोष हंबर ,एकनाथ साबळे,सुभाष पालवे, श्रीधर डोळस, डॉ गणेश दौड, प्रदिप पाटेकर, कैलास पाटेकर, शेषराव गिर्हे,मनोहर डोळस,रोहन साबळे, आकाश साबळे, संभाजी फसले,राहूल साबळे, पांडुरंग सांगळे, भाऊराव खवले, नितिन साबळे,राजेंद्र साबळे,गणेश जायभाये,अनिल साबळे, बाळासाहेब खोसे,गणेश चने,विशाल साबळे, मनोज साबळे, राबीन साबळे, अजय साबळे, तुषार गिर्हे, अभिजीत लांडे,सचिन साबळे,किरण हंबर,सुयोग देशमुख,दिपक देशमुख,शिवाजी शेलार, भगिरथ वाघमारे, विकास बोरूडे, अनिकेत लांडे, प्रदिप लांडे, आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## सोमवारी रंगणार कर्जतमध्ये राजमुद्रा केसरीसाठी कुस्त्यांचा थरार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : कै पै भास्कर तोरडमल व कै पै दिलीप तोरडमल यांच्या पुण्यतिथीनिमित्त कर्जत येथे राजमुद्रा केसरी निकाली कुस्त्यांचे मैदान सोमवार, दि २० एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले असून यात मान्यवर मल्लांच्या प्रेक्षणीय कुस्त्या संपन्न होणार असल्याची माहिती राजमुद्रा ग्रुपचे अध्यक्ष आणि जिल्हा तालीम संघाचे उपाध्यक्ष विजयकुमार तोरडमल यांनी पत्रकार परिषदेत दिली. या कुस्ती मैदानात डबल महाराष्ट्र केसरी पै. हर्षवर्धन सदगीर आणि हरियाणा केसरी पै. मंजितसिंग यांची लक्षवेधी लढत कुस्ती शौकिनांना पाहायला मिळणार आहे. यासह सोलापूरचे पै. हनुमंत पुरी, सांगलीचे पै. बाळू अपराध, कर्जत केसरी २०२४ पै. रोहित मोढळे व आष्टीचे पै. मनोज पवार आपले कसब पणाला लावणार आहेत.

'राजमुद्रा केसरी' किताबासाठी कर्जतचा पै. गणेश चव्हाण आणि कवलापूरचा पै. अक्षय माळी यांच्यात लढत होणार असून विजेत्या मल्लास दोन किलो चांदीची गदा आणि १ लाख ११ हजार १११ रुपयांची बिदागी मिळणार आहे. यासह विविध वजनी गटात दिग्गज मल्लांच्या सहभागाने रंगणाऱ्या या कुस्ती स्पर्धेत लाखो रुपयांची रोख बक्षिसे अदा केली जाणार असल्याची माहिती विजयकुमार तोरडमल यांनी दिली. सोमवार, दि २० रोजी दुपारी ३ वाजता कै पै दिलीपनाना तोरडमल क्रीडा संकुलांच्या प्रांगणात हा कुस्त्याचा थरार पहावयास मिळणार असून यासाठी मोठ्या संख्येने कुस्ती शौकिनांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राजमुद्रा समूहाकडून वस्ताद ईश्वर तोरडमल, सचिन जाधव, अशोक तोरडमल, धरमसिंग परदेशी, किरण नलवडे यांनी केले आहे.

या कुस्त्यांचे बहारदार समालोचन आणि निवेदक प्रशांत भागवत, युवराज सोलनकर आपल्या पहाडी आवाजात करणार आहे.

### २०१३ पासून राजमुद्रा केसरी कुस्ती स्पर्धेची घोडदौड

कै दिलीप तोरडमल आणि कै भास्कर तोरडमल या बंधूंच्या स्मृतीदिनानिमित्त २०१३ पासून ग्रामीण मल्लांना कुस्तीसाठी व्यासपीठ मिळावे म्हणून राजमुद्रा केसरी स्पर्धा भरविण्यात येत आहे. तोरडमल क्रीडा संकुलाने मागील १३ वर्षांपासून अनेक मल्लांना घडवत कुस्ती मैदान गाजवले आहे. यातील अनेक मल्लांनी राज्य पातळीसह देश पातळीवर खेळण्याचे भाग्य प्राप्त केले. अनेक मल्ल प्रशासकीय पातळीवर देखील काम करीत आहे.

## नायगाव जुने शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : तालुक्यातील नायगाव जुने येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रसेन लांडे व मीनाताई लांडे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. आकर्षक विद्युत रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी आणि डीजेच्या तालावर साजऱ्या झालेल्या या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

तांडव नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सर्वधर्मसमभाव, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्फूर्ती गीत, राजमाता अहिल्यादेवींचे गौरवगीत, देशभक्तीपर गीते तसेच विनोदी कीर्तन, हॉरर डान्स आदी सादरीकरणांनी रंगत आणली. विशेष आकर्षण म्हणून छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता अहिल्यादेवी यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांचे घोड्यावरून आगमन झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सैराट गाण्यांवर पालकांनीही ठेका धरत उत्साह वाढवला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना कै. गोरक्षनाथ लांडे यांच्या स्मरणार्थ ट्रॉफी व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शिक्षक व कोरिओग्राफरचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रेहाना मुजावर यांनी केले तर आभार मुख्याध्यापक शाकीर शेख यांनी मानले. कार्यक्रमास पालक, विद्यार्थी व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खून प्रकरणाचा तपास लावा, अन्यथा ठिय्या आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : सालवडगाव येथील तरुणाच्या खून प्रकरणातील तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, तपासाची गती अत्यंत संथ असल्याचा आरोप करत संतप्त ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. येत्या आठ दिवसांत आरोपींना अटक न झाल्यास शेवगाव पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मृताच्या कुटुंबीयांसह ग्रामस्थांनी दिला आहे.

या संदर्भात सालवडगाव येथील रहिवासी दिनकर भानुदास लांडे यांनी शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन दिले आहे. त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, त्यांचा मुलगा संदीप दिनकर लांडे याचा ११ एप्रिल २०२६ रोजी खून झाला होता. या घटनेनंतर शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, काही दिवस उलटूनही आरोपी अद्याप मोकाट असून त्यांना अटक करण्यात आलेली नाही.

लांडे यांनी आपल्या निवेदनात दुःख व्यक्त करत सांगितले की, मी मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. माझ्या मुलाच्या खुनातील आरोपी अजूनही फरार आहेत. पोलिसांकडून तपास जलदगतीने लाऊन आम्हाला न्याय मिळावा. पीडित कुटुंबाने व ग्रामस्थांनी या प्रकरणाचा सखोल व जलद तपास करून आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. जर येत्या आठ दिवसांत कारवाई झाली नाही, तर सालवडगाव ग्रामस्थांच्या वतीने कोणतीही पूर्वसूचना न देता शेवगाव पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच, या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## काकडे शैक्षणिक समूहाकडून डॉ. आंबेडकरांना अभिवादन




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव** : आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शेवगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष अँड. डॉ. विद्याधर काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, शिक्षण विभाग सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य दत्तात्रय मोरे, प्रा. अशोक तमनर, प्रा. ज्ञानेश्वर लबडे, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे, रविंद्र आगळे, अविनाश भागवत, विद्यालयातील व सर्व कर्मचारी वृंद यांनी शेवगाव शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अँड .डॉ .विद्याधरजी काकडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपला भारत देश घडवणाऱ्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चंद्र , सूर्य असेपर्यंत कायम घेतले जाईल असे सांगितले. आंबेडकरांनी समाजाला समतेचा, स्वातंत्र्याचा मार्ग दिला.

अगोदर समाज सुधारला पाहिजे तरच समाजामध्ये स्वातंत्र्य पचवण्याची ताकद निर्माण होईल असे त्यांचे मत होते त्यामुळेच आंबेडकरांनी सामाजिक सुधारणांवर भर दिला. आपले विचार व्यक्त करताना अँड .काकडे पुढे म्हणाले, की डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,छत्रपती शिवाजी महाराज व इतर महापुरुषांच्या पुण्यतिथी किंवा जयंतीच्या दिवशी शाळा, महाविद्यालयांना सुट्टी न देता विद्यार्थ्यांना शाळेमध्ये उपस्थित ठेवून त्यांच्यात महापुरुषांचे विचार रुजवावेत. प्रत्येकाने महिन्यातून किमान एक तरी पुस्तक वाचावे व ज्ञान मिळवावे असे आवाहन केले.

के .डी जाधव, प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर यांनी यावेळी उपस्थितांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा अनिल जगताप यांनी केले तर आभार जरीना शेख यांनी मानले.

## शिक्षण व बुद्धिमत्तेच्या क्षमतेवरच विश्वरत्न ही पदवी : अनिल मगर



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : हिरा हा अमूल्यच असतो. शिक्षण र बुद्धिमत्तेच्या क्षमतेवरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विश्वरत्न ही पदवी मिळाली.विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचे काही अंशी विचार जिवनात स्वीकारावेत असे प्रतिपादन पर्यवेक्षक अनिल मगर यांनी केले.

चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली.प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर उपमुख्याधापिका अंजली चिंतामण,संजय दुधाडे ,अशोक आघवणे ,दादासाहेब ज्योतीक, आत्माराम झरेकर, शरद सुपारे वत्सला जाधव,शितल दहिवाळकर, सुरेंद्र लोहकरे, किरण गोरे,सर्जेराव निकाळजे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी उपमुख्याध्यापिका अंजली चिंतामण आपल्या मनोगतात म्हणाल्या की, साहित्याचे खरे डॉक्टर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.त्यांनी उच्च राज्यघटना जगाला दिली.

शेळी बनून शंभर दिवस जगण्यापेक्षा एक दिवस वाघ म्हणून जगा.तसेच तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकर घ्या व एक रुपयाचे पुस्तक घ्या. शिक्षक प्रतिनिधी म्हणून सर्जेराव निकाळजे,किरण गोरे, श्रीकांत त्र्यंबके तसेच विद्यार्थ्यांमधून प्रणाली कामटे, गीतांजली डोंगरे, अमृता तेलोरे, परि चित्ते, प्रियंका सोळुंके, प्रतीक्षा टकले, अक्षरा म्हस्के आदींनी आपले मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्ष सूचना संजय दुधाडे, अनुमोदन अक्षय पुरनाळे, सूत्रसंचालन प्रभाकर मराठे यांनी केले तर आभार शितल दहिवाळकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

## संविधानाचा आदर व पालन हीच खरी आंबेडकरांना आदरांजली : सुरेंद्र खर्डे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : संविधानाचा आदर व पालन करणे हीच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरी आदरांजली आहे, असे प्रतिपादन सुरेंद्र खर्डे पाटील यांनी केले. कोल्हार येथे भीमशक्ती मित्र मंडळाच्या वतीने आयोजित आंबेडकर जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मानसी गायकवाड हिने संविधान उद्देशिका वाचन केले, तर नानासाहेब पंडित यांनी भीम वंदना व बुद्ध वंदना सादर केली. अरुणाताई पंडित यांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी बोलताना खर्डे यांनी सध्याच्या राजकीय वातावरणावर भाष्य करत संविधानाची गळचेपी होत असल्याची खंत व्यक्त केली. तरुण पिढीला शिक्षणापासून दूर ठेवून जातीय व धार्मिक भावनांमध्ये अडकवण्याचा प्रयत्न होत आहे. तरुणांनी राजकारणाच्या आहारी न जाता शिक्षण घेऊन स्वावलंबी बनावे आणि गावाच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात सनई वादक दादू लोखंडे यांचा उत्कृष्ट सनई वादक पुरस्काराबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी अशोक असावा, संभाजी देवकर पाटील, तबाजी लोखंडे, प्रवीण लोखंडे, पंढरीनाथ खर्डे, ज्ञानेश्वर खर्डे, दिलीप बोरुडे, विनीत हिरानंदानी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण लोखंडे यांनी केले, तर आभार लवलेश लोखंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भीमशक्ती तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री



## किरकोळ वादातून दगडाने हल्ला; तरुण जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर गंभीर मारहाणीत होऊन एका तरुणाच्या डोक्यात दगड मारल्याची घटना घडली. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी विराज रमेश शहाराव (वय २२, रा. सोनई रोड, घोडेगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार १४ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ७ वाजता त्यांच्या राहत्या घरी हा प्रकार घडला. आरोपी रमेश भाऊसाहेब शहाराव (रा. घोडेगाव) याने किरकोळ कारणावरून वाद घालत शिवीगाळ केली. वाद वाढत गेल्यानंतर आरोपीने हातातील दगड घेऊन फिर्यादीच्या डोक्यात मारहाण केली. या हल्ल्यात विराज शहाराव गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच फिर्यादीच्या आईलाही आरोपीने मारहाण करून दमदाटी केल्याची तक्रार सोनई पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार एम. आर. आडकिते पुढील तपास करीत आहेत.

# अक्षय कर्डिले आमदार होणे म्हणजेच विकासकामांना गती मिळणे : डॉ सुजय विखे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : स्वर्गीय कर्डिले साहेबांच्या पश्चात ही निवडणूक केवळ एका पदासाठी नसून या भागाच्या विकासाचा वारसा पुढे नेण्यासाठी आहे. अक्षय कर्डिले यांना निवडून देणे म्हणजे पर्यायाने डॉ. सुजय विखे यांनाच आमदार म्हणून निवडून देण्यासारखे आहे. अक्षय कर्डिले आमदार झाल्यानंतर त्यांच्या प्रत्येक अर्जावर आणि कामावर मी स्वतः लक्ष देऊन ते पूर्ण करण्याची जबाबदारी घेतो, असा ठाम विश्वास माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी प्रचारसभांमधून जोरदार भूमिका मांडत, अक्षय कर्डिले आमदार होणे म्हणजेच माझ्या माध्यमातून विकासकामांना गती मिळणे,असा ठाम विश्वास व्यक्त केला. तांबेरे, गुहा गणेगावसह विविध गावांतील सभांमध्ये त्यांनी मतदारांना विकासाच्या मुद्द्यावर एकत्र येण्याचे आवाहन केले. तांभेरे येथे गुहा व आरडगाव गणातील कार्यकर्त्याची बैठक डॉ सुजय विखे पाटील यांचा प्रमुख उपस्थित संपन्न झाली. यावेळी देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजित कदम तसेच भाजपा महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात त्यांनी निळवंडे पाणी प्रकल्पाचा इतिहास उलगडताना विरोधकांवर टीका केली. पूर्वी केवळ पाहणी आणि आश्वासनांचे राजकारण झाले, पण प्रत्यक्षात पाणी मिळवून देण्याचे काम नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा मंत्री असताना केले, असे ते म्हणाले. पाण्यासाठी दशकांपासून संघर्ष करणाऱ्या गावांना न्याय मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. गुहा गणातील परिसरासाठी १८६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती देत त्यांनी विविध कामांचा आढावा घेतला.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत गुहा येथे साडेपाच कोटींचा रस्ता पूर्ण झाला असून, ताराबाद येथे ग्रामीण रुग्णालय आणि अनेक गावांत सभा मंडप उभारण्यात आले आहेत. तसेच, पुढील तीन वर्षांत 'पीडीएन' प्रणालीद्वारे प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पाणी पोहोचवण्याचे उद्दिष्ट त्यांनी मांडले. या निवडणुकीत विकासासाठी सामंजस्याची भूमिका घेतल्याबद्दल त्यांनी प्राजक्त तनपुरे यांचे आभार मानले. मात्र, कार्यकर्त्यांनी अधिक सक्रिय होण्याची गरज असल्याचे सांगत, प्रत्येक घरापर्यंत प्रचार पोहोचला पाहिजे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. विखे म्हणाले, मी लोकांसाठी आणि गरिबांसाठी काम करतो. पराभवानंतरही मी थांबलो नाही, असे सांगत त्यांनी पुन्हा एकदा जनसेवेचा संकल्प व्यक्त केला. राहुरी तालुक्यातील ही निवडणूक आता विकास विरुद्ध विरोधक अशी रंगत चालल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

ही केवळ निवडणूक नाही, तर आपल्या गावाच्या विकासाची आणि भविष्यातील वाटचालीची निर्णायक लढाई आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने आणि मतदाराने विकासाच्या विचाराला प्राधान्य देत एकजुटीने मतदान करून अक्षय कर्डिले यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करणे हीच आपली खरी जबाबदारी आहे, असे प्रतिपादन नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी केले.

### अक्षय कर्डिलेंच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री राहुरीत...

राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भव्य जाहीर सभा राहुरी शहरात आयोजित करण्यात आली आहे. ही सभा दि. २० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असून पर्यटन मंत्री पंकजा मुंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी दिली.

# श्रीरामपूर, शिर्डी कोपरगावचे तापमान ४० अंशावर

## रख रखते ऊन, मैदानी खेळावरील मुलांची चिंता

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : अहिल्यानगर जिल्ह्यात उष्णतेची लाट आहे. सध्या कडक ऊन असून कमाल तापमान ३९ ते ४० अंश डिग्री सेल्सिअस आहे. श्रीरामपूर शिर्डी आणि कोपरगाव येथील तापमान ४० अंशावर पोहोचले आहे.

जिल्ह्यात प्रखर सूर्यप्रकाश असून किमान तापमान २४ ते २६ अंशावर राहण्याची शक्यता आहे. अकोले, संगमनेर, कोपरगाव, शिर्डी, श्रीरामपूर, राहुरी, नेवासा, शेवगाव, पाथर्डी, नगर, पारनेर, कर्जत, जामखेड, श्रीगोंदा या सर्व तालुक्यांत उष्ण तापमान राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवले आहे.



अहिल्यानगर जिल्ह्यामधील प्रमुख तालुक्यांचे तापमानअंदाज तो पुढील प्रमाणे-अहिल्यानगर शहरात कमाल ३९ किमान २६ अंश सेल्सिअस, अकोले आणि पारनेर तालुक्यात इतर भागांच्या तुलनेत थोडे कमी म्हणजे ३७ -३८ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता असून यासह उकाडा राहील. कर्जत जामखेड तालुक्यात हवामान उष्ण व कोरडे, तर तापमान ४० अंश सेल्सियस इतके राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, दुपारी १२ ते ४ या वेळेत थेट सूर्यप्रकाशात जाणे टाळावे.

नागरिकांनी वाढत्या उष्ण पासून स्वतःचा बचाव करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. सध्या शाळांना सुट्ट्या लागल्या असल्याने मुले दुपारच्या वेळी मैदानी खेळ खेळण्यासाठी बाहेर पडतात यावेळी पालकांनी मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने लक्ष देणे गरजेचे आहे. शक्यतो सकाळी दहा वाजण्याच्या आत किंवा सायंकाळी पाच नंतरच मुलांना घराबाहेर पडू द्यावे, बाहेर जाताना मुलांना सुती कपडे वापरावे त्यांनी डोक्यावर टोपी किंवा रुमाल ठेवावा मुलांच्या आहारात लिंबू सरबत ताक आणि पाण्याचे प्रमाण भरपूर ठेवावे. हवामान विभागाने दिलेल्या या इशाऱ्यामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळी विनाकारण घराबाहेर पाडणे टाळावे आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन करण्यात आले आहे. हवामान बदलाच्या परिणामांची तीव्रता राज्यासह जिल्ह्यात वाढू लागली आहे मुख्यतः मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आणि एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात काही भागात वादळी वारे गारपीट आणि पावसाची नोंद झाली होती.

राज्यात पावसाळी हवामान होते. त्यामुळे यादरम्यान कमाल आणि किमान तापमानात काहीशी घट नोंद दिली गेल्याने जिल्हावासी यांना तीव्र उन्हापासून काही काळ दिलासा मिळाला होता. मात्र गत तीन-चार दिवसांपासून जिल्ह्यात बहुतांश भागातील तापमान किमान दोन ते तीन अंशांनी वाढले आहेत. श्रीरामपूर शिर्डी कोपरगाव येथे कमाल तापमान मध्ये वाढ होऊन तापमानाचा पारा ४० अंशावर पोहोचला आहे. दुपारच्या वेळी शहरातील सर्व रस्ते ओस पडलेले असतात. उन्हाची काहिली दूर करण्यासाठी रसवंतीगृहे फुल झालेली दिसतात. दुपारच्या वेळी लहान मुले बाहेर जाऊ नये ही चिंता वाढलेली दिसत आहे.

## सेल्समननेच दुकानातील मोबाईल चोरले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील एका मोबाईल दुकानातून दुकानातील सेल्समननेच बनावट बिले तयार करून सुमारे ७ लाख ९१ हजार रुपयांचे मोबाईल दुकानातील सेल्समनने चोरून नेले. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दुकानातील सेल्समनविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलु तिलकराज ग्रोव्हर यांचे पुजारा टेलीकॉम प्रा. लि. नावाचे मोबाईल दुकान असून येथे संकल्प राजेंद्र सोनवणे (रा. मारुती मंदिराजवळ, खंडाळा) हा गेल्या वर्षभरापासून सेल्समन म्हणून कार्यरत होता. १ एप्रिलला दुकानाचे मासिक ऑडिट करण्यात आले असता विविध कंपनींचे महागडे मोबाईल स्टॉकमध्ये कमी असल्याचे निदर्शनास आले. चौकशी केली असता, संबंधित सेल्समनने मोबाईल चोरी करून ते इतर दुकानदारांना विकल्याची कबुली दिली. तसेच, विक्रीसाठी बनावट (डुप्लिकेट) बिलेही तयार केल्याचे समोर आले आहे. चोरीस गेलेल्या मोबाईलमध्ये विविध मॉडेल्सचा समावेश असून, त्यांची एकूण किमत ७ लाख ९१ हजार २९४ रुपये इतकी आहे.

# हस्तलिखित संविधान प्रत लेखनाची संकल्पना प्रेरणादायी : विवेक कोल्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एक प्रेरणादायी उपक्रम राबवित पुष्पाताई अण्णासाहेब काळे यांनी भारतीय संविधानाची हस्तलिखित प्रत तयार करण्यास सुरुवात केली आहे. या उपक्रमाचा शुभारंभ नगरपरिषद वाचनालय येथे उत्साहात पार पडला असून यावेळी युवा नेते विवेक कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, सभापती संजना उदावंत, गटनेते प्रसाद आढाव यांच्यासह नगरपरिषदेमधील सर्व पदाधिकारी व नगरसेवक, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापूर्वी त्यांनी 'ज्ञानेश्वरी', 'साई चरित्र' आणि 'संत तुकाराम गाथा' यांसारख्या ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती तयार करून आपली लेखननिष्ठा सिद्ध केली आहे. आता भारतीय संविधान हस्तलिखित स्वरूपात साकारण्याचा त्यांचा संकल्प समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.पुष्पाताई काळे यांचा हा उपक्रम संविधानाविषयी आदर आणि जागरूकता वाढविणारा ठरणार आहे अशा शुभेच्छा युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी दिल्या.

यावेळी डॉ. अमोल अजमेरे, संदीप देवकर, संतोष गंगवाल,संजय उदावंत, कलविंदर दडीयाल, निसार शेख, ड गणेश मोकळ, चंद्रकांत वाघमारे, राहुल खरात,राकेश काले, रोहित कनगरे, शैलेश नागरे,हेमचंद्र भवर आदींसह मान्यवर उपस्थित होते.

# धांदरफळ खुर्द येथे शेतकऱ्यांचा वीजप्रश्नी मोर्चा

## रास्ता रोकोतून तीव्र आंदोलन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : उन्हाची तीव्रता वाढत असताना शेतीसाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने संतप्त झालेल्या पंचक्रोशीतील सुमारे ५०० ते ५५० शेतकऱ्यांनी धांदरफळ खुर्द येथील वीज सबस्टेशनवर मोर्चा काढत भर उन्हात रास्ता रोको आंदोलन केले. वीज वितरण विभागाच्या ढिसाळ कारभाराविरोधात शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत वीजपुरवठा सुरळीत करावा, तसेच रोटेशन काळात किमान ११ तास वीज मिळावी, अशी मागणी केली.

धांदरफळ खुर्द येथे झालेल्या या आंदोलनात विविध गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेतकऱ्यांनी सांगितले की, अपूर्ण दाबाने वीजपुरवठा होत असल्याने शेतीपिके व पशुधन धोक्यात आले आहे. पूर्वी पूर्णवेळ वीज मिळत होती, मात्र सध्या परिस्थिती पूर्णतः बदलली असून प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

सुमारे चार तास चाललेल्या रास्ता रोकोनंतर शेतकऱ्यांनी विविध मागण्यांचे निवेदन दिले. यात जीर्ण झालेले वीज खांब व तारा दुरुस्त करणे, बंद डीपी सुरू करणे, ३३ केव्ही फीडरचा कमी दाबाचा पुरवठा सुरळीत करणे आदी मागण्यांचा समावेश होता. यावेळी उपकार्यकारी अभियंता चव्हाण, मेखे व शिलावंत यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत वीजपुरवठा लवकरच सुरळीत केला जाईल व एक-दोन दिवसांत ११ तास वीज देण्याबाबत निर्णय कळविण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

या आंदोलनात युवकांसह वृद्ध शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती लक्षवेधी ठरली.

# राहुरीच्या पोटनिवडणुकीत आजी-माजी खासदार प्रचारात !

## राजकीय वातावरण तापले

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : विधानसभेची पोटनिवडणुक जशी जशी जवळ येत आहे तसे तसे राजकीय वातावरण तापू लागले. त्यामध्ये आता आजी व माजी खासदारांनी प्रचारासाठी सक्रिय सहभाग घेऊन आपापल्या उमेदवारांसाठी जिंकण्याचे ध्येय ठेवून निवडणूकीत अधिक रंगत आणली आहे. अहिल्यानगरचे खा. निलेश लंके हे राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट)चे उमेदवार गोविंद मोकाटे यांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत. तर माजी खा. डॉ. सुजय विखे हे भाजपचे उमेदवार अक्षय कर्डीले यांच्या प्रचारार्थ मतदार संघातील वाड्या वस्त्या व खेडोपाड्यात जाऊन मतदारांशी संवाद साधित आहेत. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. सुजय विखे-पाटील म्हणाले की, या निवडणुकीत अजिबात गाफील राहून चालणार नाही.





त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने घरोघरी जाऊन मतदारांशी संपर्क साधावा आणि आपली भाजपाचे व महायुतीचे अधिकृत उमेदवार अक्षय कर्डीले यांना अधिकाधिक मतांनी विजयी करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच तालुक्यातील अनेक गावांमध्ये प्रचारसभांचे आयोजन करून मतदारांपर्यंत पक्षाची भूमिका पोहोचविण्याचे काम करीत आहेत. याच अनुषंगाने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार गोविंद मोकाटे यांच्या विजयाबाबत पक्षाच्या नेत्यांनी आपलाच उमेदवार विजय होणार असा आशावाद खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केला आहे.

याचवेळी ते म्हणाले की, राहुरीच्या पोटनिवडणुकीत शेवटच्या क्षणी काहीही होऊ शकते असे सांगून निवडणुकीत रंगत आणली आहे.

राहुरीतील स्वाभिमानी मतदार निश्चितच गोविंद मोकाटे यांच्या पाठीशी उभे राहतील आणि त्यांना विधानसभेत पाठवतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. राजकारणात योग्य वेळी योग्य निर्णय घ्यावेच लागत असतात. त्यामुळे राहुरी विधानसभा पोट निवडणुकीत आजी-माजी खासदारांच्या सक्रिय सहभागामुळे राहुरी विधानसभा पोट निवडणूक चुरशीची होणार असल्याचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे आता राहुरी तालुक्यातील सुज्ञ मतदार नेमका कुणाला कौल देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

येत्या २० एप्रिल रोजी राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या प्रचाराची सांगता सभा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नामदार पंकजा मुंडे यांचा उपस्थित होणार असल्याने महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांचे पारडे निश्चितच झुकणार असल्याचे दिसणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेण्याची शक्यता वर्तविली जात आहे.